# महापुरुषांचे कौशल्य विचार



© सर्वाधिकार
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय**
**महापालिका मार्ग, मुंबई - १**

प्रकाशक
**संचालक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय**
**महापालिका मार्ग, मुंबई - १**

मुद्रक
**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय**
**मुंबई**

मुखपृष्ठ
**श्री. कांचन शिंदे, नाशिक**

## अभ्यासक्रम समिती

श्री. प्रशांत डोंगरे
श्री. भारत जाधव
श्री. राजेंद्र महाजन
श्री. रवींद्र दांडगे
श्री. आशिष खरात
श्री. विजय दुपटे
श्रीमती अनघा सांगरुळकर
श्रीमती गीतांजली परदेशी
श्री. दीपक बाविस्कर
श्री. जयराम ससाणे
श्री. राजेंद्र भागवत
श्री. शिवाजी हांडे
श्री. आनंद शेंद्रे
श्री. प्रशांत शिरुडे
श्री. निनाद तेंडुलकर

## लेखन समिती

श्री. अरविंद गोखले
श्री. गोपाळ महाजन
श्री. पार्थ बावस्कर
श्री. प्रा. डॉ. सोमीनाथ खाडे
श्री. रविराज पराडकर
श्रीमती अश्विनी मयेकर (समन्वयक)

## संपादन

श्री. साहेबराव धनवटे

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे.

सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे.

माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने
नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.

त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या
अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि
वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि
प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी
निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.

त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच
माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥ धृ ॥
भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥ १ ॥

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ॥ २ ॥

# प्रस्तावना

महाराष्ट्र भूमी अनेक अर्थांनी थोर आहे. या मातीत थोर विचारवंत जन्माला आले. सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र सतत आघाडीवर राहिला आहे. याचे कारण महाराष्ट्राच्या समाज मनाची अनेक महापुरुषांनी योग्य मशागत केली आहे. कौशल्य विकासात महाराष्ट्र सक्रिय योगदान देत आहे, या मागचा इतिहास शोधला तर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या अनेक महामानवांचे द्रष्टेपण दिसून येते. या महापुरुषांच्या विचार आणि कृतीत तंत्रशिक्षण, कौशल्याचे महत्त्व स्पष्ट होते. टाकसाळ निर्मिती, किल्ले बांधणी, आरमार उभारणी, शस्त्र निर्मिती करण्याचे शिक्षण आणि प्रशिक्षण छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राज्यातील जनतेला दिले आणि त्यांच्या सहकार्याने रयतेचे राज्य उभे केले. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार सुरू झाल्याच्या प्रारंभ काळात महात्मा जोतीराव फुले यांनी कन्स्ट्रक्शन कंपनी उभी केली. दर्जेदार पूल, रस्ते, इमारती बांधल्या. मुद्रण कला शिकून घेतली. प्रिंटिंग प्रेस निर्माण करून पुस्तक छपाई केली. शेअरचे महत्त्व जनतेला सांगितले, त्याचबरोबर कौशल्य शिक्षण आणि उद्योजकता यांबाबत त्यांच्या अखंडांमधून जनप्रबोधन केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्योगधंदे देशाचा कणा मानले. त्यासाठी आवश्यक शिक्षण देण्याचा त्यांनी नेहमीच पुरस्कार केला. लोकमान्य टिळकांनी 'धंदे शिक्षण' (व्यवसाय शिक्षण) देण्याचा आग्रह धरला. स्वतःची प्रिंटिंग प्रेस उभी करून केसरी व मराठा ही वृत्तपत्रे सुरु केली. नोकरी ऐवजी स्वतःचे उद्योग व्यवसाय उभारा असा सल्ला स्वातंत्र्यवीर सावरकर नेहमीच तरुणांना देत असत. कौशल्य शिक्षण घेतानाच आरोग्याकडेही तरुणांनी लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्राचे अस्सल रांगडे खेळ तरुणांनी खेळून शरीरही कमाविले पाहिजे. हा विचार औद्योगिक प्रशिक्षण घेणाऱ्या तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाला नेहमीच मार्गदर्शन लाभते. औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्र शाळा यामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या तरुणांना विविध उपक्रम राबवून कौशल्यासह व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मा. मंगल प्रभात लोढा यांचे कुशल मार्गदर्शन लाभते. शासकीय संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या सर्वच प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा पाचशे रुपये विद्यावेतन, खाजगी सरकारी आयटीआय मध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना शुल्क शासनाकडून प्रतिपूर्तीचा लाभ, खाजगी कंपन्यांच्या भागीदारीतून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या गुणवत्ता


वाढीसाठी प्रयत्न, तरुणांसाठी रोजगार मेळावे, वाचन संस्कृती वाढण्यासाठी व स्पर्धात्मक परीक्षा देणाऱ्या तरुणांना सहाय्य होण्यासाठी अभ्यासिका, गडकिल्ल्यांची स्वच्छता व संवर्धन, 'ऑन जॉब ट्रेनिंग' सारख्या प्रशिक्षण योजना, काळाच्या गरजेनुसार एरोनॉटिकल सारख्या सेक्टरमध्ये ' एरोनॉटिकल स्ट्रक्चर अँड इक्विपमेंट फिटर' सारख्या नवीन ट्रेडची सुरुवात, मॉडेल आयटीआय निर्माण करणे यांसह राज्यातील आयटीआयचा दर्जा उंचावण्यासाठी विविध उपक्रम व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मा. ना. मंगल प्रभात लोढा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली राबवत आहे. 'महापुरुषांचे कौशल्य विचार' ही पुस्तिका निर्माण करतानाही मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमहोदय यांचे मार्गदर्शन लाभले आहे. अपर मुख्य सचिव मा. आशिष कुमार सिंह यांनीही मार्गदर्शन केले आहे. पुस्तकासाठी लेखन करणारे सर्व लेखक, तंत्रज्ञ यांनी परिश्रम घेतले. त्यामुळेच ही सुबक पुस्तिका अतिशय कमी वेळात पूर्ण करणे शक्य झाले आहे.

महापुरुषांचे तेजस्वी विचार महाराष्ट्र आणि देशाला नेहमीच दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरले आहेत. या विचारांतून आजच्या तरुणांनी प्रेरणा घेऊन आधुनिक कौशल्य शिकून घेऊन देशाच्या उद्योग व्यवसायात योगदान द्यावे. त्यातूनच देशाचा विकास होईल, याबद्दल तीळ मात्र शंका नाही.

सर्व महापुरुषांना विनम्र अभिवादन!

**दि. अं. दळवी**
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई – १.

# अनुक्रमणिका


| प्रकरणाचे नाव | | पान नं. |
|---|---|---|
|  | **छत्रपती शिवाजी महाराज**<br>व्यवसाय, तंत्रशिक्षण, कौशल्याचे प्रेरणास्थान ................................... | **११** |
|  | **महात्मा जोतीराव फुले**<br>उद्योजकीय कौशल्य असलेले समाजसुधारक ................................... | **२१** |
|  | **लोकमान्य टिळक**<br>'धंदेशिक्षणा'चे पुरस्कर्ते ................................... | **३१** |
|  | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>आधुनिक शिक्षणाचे पथदर्शक ....................................................... | **३९** |
|  | **स्वातंत्र्यवीर सावरकर**<br>यंत्रशक्तीचे कृतिशील पुरस्कर्ते ....................................................... | **४९** |
|  | **महाराष्ट्रातील मर्दानी आणि मैदानी खेळ** ........................ | **५७** |

# मर्दानी खेळांची प्रात्याक्षिके









१९ फेब्रुवारी १६३० - ३ एप्रिल १६८०

# छत्रपती शिवाजी महाराज व्यवसाय, तंत्रशिक्षण, कौशल्याचे प्रेरणास्थान

## संक्षिप्त परिचय

तेराव्या शतकातील अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणापासून महाराष्ट्र पारतंत्र्यात गेला. सुमारे तीन शतके चाललेल्या या परकीय सत्तांनी इथल्या लोकांवर अनन्वित अत्याचार केले. लढाया, लुटालूट, जाळपोळ, देव-धर्म-संस्कृतीचा विद्ध्वंस, स्त्रियांवरील अत्याचार अशा भीषण कालखंडात सामान्य लोकांचे प्रचंड नुकसान झाले. ह्या अंधारयुगाला संपवून अन्यायी, अत्याचारी परकीय सत्तांविरोधात न्यायाचे आणि नीतिमत्तेचे स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केले. सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य ही भारतीय इतिहासाच्या पानावरील एक अद्वितीय घटना होती.

छत्रपती शिवरायांचा जन्म शहाजीराजे भोसले आणि जिजाऊसाहेब यांच्या पोटी जुन्नरजवळील शिवनेरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी झाला. आपल्या माता-पित्यांकडून मिळालेल्या संस्कारातून त्यांचे

असामान्य व्यक्तिमत्व घडत गेले. वडिलोपार्जित मिळालेल्या पुणे, सुपे, चाकण, इंदापूर या जहागिरीच्या कारभारापासून सुरवात करीत साधारण १६४५ पासून त्यांनी मावळ मुलुखातील जनतेमध्ये स्वराज्य संकल्पनेचे बीज रोवले. आदिलशहा, मुघल अशा मोठ्या शत्रूंबरोबरच काही स्वकीय मराठे आणि सिद्दी, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज अशा सर्वांशी सामना करीत त्यांनी अतिशय परिश्रमातून स्वराज्याचे स्वप्न साकारले. अफझलखानाची स्वारी, पावनखिंड, शाहिस्तेखानावर छापा, सूरतेची लूट, आग्र्याहुन सुटका इ. अनेक प्रसंगातून त्यांचे असामान्य चरित्र कळून येते. ६ जून १६७४ रोजी रायगडावर संपन्न झालेला शिवराज्याभिषेक ही भारताच्या इतिहासातील अभिमानास्पद घटना होती. मावळ, कोकण आणि घाट प्रदेशातील त्यांचे स्वराज्य दक्षिण दिग्विजयानंतर कर्नाटक, आंध्र, तमीळ प्रांतापर्यंत पसरले. आपल्या असंख्य मावळ्यांच्या, सरदारांच्या, कारभाऱ्यांच्या निष्ठावंत त्यागातून त्यांनी एका आदर्श राज्याची निर्मिती केली.  युगायुगांना प्रेरणा देणारं सुराज्य निर्माण करून शिवछत्रपतींनी ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर इहलोकीची यात्रा संपविली.

शिवचरित्र म्हणजे आदर्श चारित्र्याचे, व्यक्तित्वाचे, राजकारणाचे, युद्धकारणाचे, अर्थकारणाचे, धर्मकारणाचे, समाजकारणाचे मार्गदर्शक उदाहरण आहे. शिवचरित्राच्या अभ्यासातून शिवरायांच्या अंगी असलेले शौर्य, धैर्य, औदार्य, साहस, निस्पृहता, न्यायनिष्ठुरता, शालीनता, सहिष्णुता अशा कितीतरी गुणांचं दर्शन आपल्याला जसं घडतं, तसंच त्यांच्या दूरदृष्टीतून स्वराज्यनिर्मितीच्या कालखंडात विकसित झालेले तंत्रज्ञान आणि कौशल्यसुद्धा दृष्टीपथात येतं. शिवछत्रपतींच्या पत्रांतून, बखरींमधून, तत्कालीन स्वदेशी आणि परकीय लोकांच्या कागदपत्रातून, तसेच रामचंद्रपंत अमात्यांनी लिहिलेल्या आज्ञापत्राच्या विविध प्रकरणातून  आपल्याला महाराजांनी केलेल्या तंत्रज्ञान आणि कौशल्य विकासाच्या कार्याची प्रचिती येते.

## दुर्गबांधणी

स्वराज्याच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराजांनी जिंकलेल्या किल्ल्यांना नवा साज चढवला, तर काही नवीन दुर्गांची निर्मिती केली. भूदुर्ग, गिरीदुर्ग, जलदुर्ग अशा सर्व प्रकारचे गड साकारले. रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात लिहितात, "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग". दुर्गांची बांधणी कशी करावी हे सांगताना ते लिहितात की, किल्ला असा मजबूत भक्कम बांधावा की शत्रूला जिंकता येऊ नये. गडालगत दुसरा डोंगर असू नये, असल्यास सुरुंग लावून पाडावा किंवा त्याचेही बांधकाम भक्कम करावे. तटबंदी - बुरुज मजबूत असावी, कमीत कमी व अभेद्य दरवाजे बनवावेत. इमारती कामचलाऊ न करता पक्क्या भरभक्कम बांधाव्यात, निष्णात माणसे गडावर तैनात ठेवावीत, अशा कितीतरी गोष्टींचा उल्लेख त्यात होतो. केवळ दुर्गम किल्ले बांधले म्हणजे झाले असे नाही, तर त्याची योग्य निगा राखण्यासाठी, देखरेखीसाठी काय केले पाहिजे, उपयोग व गरजा लक्षात घेऊन काय काय केले पाहिजे याबाबतीतले

विचारही मोलाचे आहेत. जागोजागी तोफा-बंदुकांनी किल्ला सुसज्ज करावा. त्यासाठीची आवश्यक सर्व यंत्रणा किल्ल्यातच असली पाहिजे. शस्त्रागार, दारूकोठार, धान्यांची कोठारे भरलेली असली पाहिजेत. ऊन-पावसापासून त्यांचे योग्य ते संरक्षण केले पाहिजे. याबाबतीत तत्परता हवी, आळस नको. कठीण समय कधीही येईल, त्याला सामोरे जाऊन स्वसंरक्षणासाठी प्रत्येक किल्ला सदैव परिपूर्ण असायला हवा, असे शिवछत्रपतींचे विचार होते.

दुर्गाला बाराही महिने पाणी पुरावे ह्यासाठी शिवकाळात किल्ल्यांवरच भरपूर तलाव, टाकी, कूप, विहिरी इ. ची निर्मिती केली गेली.

गडाचा कारभार पहाणारे अधिकारी, पहारेकरी, सेनाधिकारी ह्यांचे महत्व होतेच, परंतु इतरही गरजेची सर्व माणसे किल्ल्यावर असली पाहिजेत हा त्यांचा आग्रह होता. अमात्य लिहितात, "गडोगडीं ब्राह्मण, ज्योतिषी, वैदिक, वित्पन्न, तैसेच रसायनी वैद्य व झाडपालियाचे वैद्य व शस्त्रवैद्य, पंच्याक्षरी व जखमा बांधणार, लोहार, सुतार, पाथरवट, चांभार यांच्याही गड पाहून येक-येक दोन-दोन आसाम्या संग्रही ठेवाव्या." कौशल्यपूर्ण कारागिरांच्या कामांची गरज रोज असेल असं नाही, तरीही अशा लोकांचा संग्रह केला पाहिजे. शिवाय त्यांच्या उपयुक्ततेनुसार सतत उद्योगशील ठेवले पाहिजे, रिकामे ठेवू नये हे विचार मोलाचे ठरतात.

शिवछत्रपतींनी आपल्या गुणग्राहक स्वभावाने असंख्य कुशल आणि निष्णात कारागिरांची फौजच निर्माण केली. साध्या मजूरापासून शास्त्रज्ञांपर्यंत साऱ्यांचे महत्व सारखेच आहे ही त्यांची धारणा होती. उत्तम वास्तुशिल्पींना हेरून त्यांनी दुर्गबांधणी केली. मजबूत तटबुरुज, भव्य दरवाजे, नगारखाने, अंबरखाने, देवळे, प्रासाद अशा इमारती निर्माण केल्या. ध्वनिक्षेपकाचा शोध लागण्यापूर्वीचे रायगडावरील राजसभेतील नैसर्गिक ध्वनिक्षेपण पाहिले, जगदीश्वर प्रासादात मंत्रोच्चारांचे घुमणारे प्रतिध्वनी ऐकले की ह्या वास्तुरचनाकारांची जादूनिर्मिती लक्षात येते. महाराजांनी प्रत्येकाचे योग्य मोबदला देऊन कौतुक केले, मानसन्मान दिला. रायगडावरील जगदीश्वर प्रासादाच्या भिंतीवरील शिलालेख जसा तेथील विविध वास्तुंचा परिचय करून देतो तसाच इमारत खात्याचा प्रमुख हिरोजी इंदलकर ह्याच्याही कार्याची ओळख करून देतो. शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकप्रसंगी रायगड निर्मितीच्या (बांधकाम) ह्या शिलालेखात एका वास्तुतंत्रज्ञाचे नाव कोरले जाणे, हा महाराजांच्या लेखी तंत्रज्ञ आणि कुशल कारागिरांचे स्थान किती उंच होते ह्याचेच द्योतक आहे. प्रासादाच्या पायरीवरील 'सेवेचे ठाई तत्पर' हा हिरोजीचा शिलालेख अशा सर्व लोकांच्या निष्ठेची, समर्पणाची व कार्यतत्परतेची ओळख सांगतो. दुर्गांच्या देखरेखीसाठी लागणारी आर्थिक तजवीजही त्यांनी जागरुकपणे केली. एका जाबित्यात गडकिल्ल्यांसाठी दीड लाख होनांची तरतूद महाराजांनी केल्याचे दिसते.

## शस्त्रास्त्र निर्मिती

शत्रूंबरोबर लढाया करताना अद्ययावत शस्त्रास्त्रांची निर्मिती अत्यावश्यक होती. अशी शस्त्रास्त्रे परमुलुखातून खरेदी केली जात. इंग्रजादि पाश्चात्यांकडे शस्त्रास्त्रांचे अद्ययावत तंत्रज्ञान होते. त्यांच्याबरोबर युद्धासाठी तसेच तंत्रज्ञान स्वराज्यातही हवे, हा शिवरायांचा मनोदय होता. ते मिळवून इथल्या लोकांनी आपल्या प्रांतात शस्त्रास्त्र निर्मिती करावी, त्याबाबतीत आपण परावलंबी असू नये, अशी शिवरायांची भूमिका होती. त्यासाठी शस्त्रास्त्रे निर्मितीत तरबेज असलेले कारागिर शोधून त्यांना ह्या कार्यास लावले. कोकणात तळा गावी तोफांचा कारखाना उभारला. इंग्रजांसारख्या पाश्चात्य लोकांकडील तंत्रज्ञान मिळावे, त्यांच्याकडील कौशल्य आपल्या लोकांनी शिकून घ्यावे, प्रसंगी त्यांच्याकडील ह्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींचा स्वराज्यकामात उपयोग व्हावा ह्यासाठी त्यांनी आवश्यक तो सर्व खर्च केला. दि. २२ सप्टेंबर १६७७ रोजी मद्रासचा गव्हर्नर सर विल्यम लँगहॉर्न ह्याला पाठविलेल्या पत्रात महाराज लिहितात की, किल्ल्यांच्या नवीन बांधकामांसाठी तोफांचे मोठे गाडे करणे, सुरुंग लावून दगडी उडवणे इ. कामे जाणणाऱ्या लोकांना पाठवा. चांगला पगार देऊन अनेक किल्ल्यांमध्ये त्यांना काम देऊ. ह्या पत्रातून अद्ययावत तंत्रज्ञान आणि त्यात तरबेज असलेल्या परकीय लोकांचा महाराज कसा उपयोग करून घेत ते कळते. शिवकाळात विविध शस्त्रांना लागणारा कच्चा धातू, लोखंड, पोलाद, पितळ, इ. हे दूरवरच्या प्रांतातून आणले जाई. प्रसंगी पाश्चात्य व्यापाऱ्यांकडूनही त्याची आयात होत असल्याचे दाखले सापडतात.

आज्ञापत्रात अमात्यांनी म्हटलंय की, नवनवीन हत्यारांच्या निर्मितीबरोबर त्यांचा वापरही वरचेवर केला पाहिजे. त्याबाबतीत नियमित प्रशिक्षणाचे आणि सरावाचे सातत्य ठेवले पाहिजे. घोड्यांच्या पागा, गजशाळा यांची योग्य ती निगा राखली पाहिजे. घोडेस्वारीसाठी लागणारे जिन, खोगीर, बख्तर इत्यादी सामग्रीची जाणकार माणसे तैनात ठेवली पाहिजेत. त्याकाळच्या शस्त्रांची यादीही आज्ञापत्रात आली आहे. "तरवारा, कटारा, जमदाडा, पट, भाले, बाक, बिचवे, सेत्या, टाकण्या, तीर, कमाना, बंदुखादि हत्यारे, बख्तरे, घुम्या, टोप, मुदटे, चिलखतें, पाखरा, ताज, हुके, दारूगोली, बाणादि सामान बरे संपादून मजबुतीत आसावें." अशा अनेक शस्त्रांचा, संरक्षक गोष्टींचा वापर स्वराज्याच्या शत्रूंबरोबर लढायांत होतो ह्याची जाणीव सर्व कारागिरांना होती. त्यासाठी त्यांनी आपापले कौशल्य पणाला लावले होते.

## आरमार

सागरी सीमासंरक्षण व व्यापार ह्या दोन्ही कारणांसाठी नौदलसामर्थ्याचे महत्व शिवरायांनी जाणले होते. त्याकाळी समुद्रावर सत्ता पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज यांसारख्या पाश्चात्यांची आणि जंजीरेकर सिद्दीची होती. भारतीय सत्तांचे स्वतःचे आरमार असे नव्हतेच. आज्ञापत्रात अमात्य म्हणतात, "अरमार म्हणजे

येक स्वतंत्र राज्यांगच आहे. ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी प्रजा आहे, तद्वतच ज्या जवल अरमार त्याचा समुद्र. त्याकरिता अरमार अवस्यमेव करावे."

समुद्रकिनाऱ्यावर पारंपरिक मासेमारी, वाहतूक इत्यादिंद्वारे समुद्राशी पिढ्यानपिढ्या जोडल्या गेलेल्या कोळी, आगरी, भंडारी अशा लोकांना महाराजांनी हाताशी धरले. त्यांच्याकडील पारंपरिक सामुद्रीक ज्ञानाचे रुपांतर सक्षम नौसेनेत केले. जहाजबांधणीचे कौशल्य अंगी असलेल्या हुशार सुतार, लोहार, चांभार अशा कारागीर लोकांनी आरमाराच्या कामात स्वतःला झोकून दिले.

सोळाव्या शतकापासून पोर्तुगीजांची सत्ता महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर होती. पोर्तुगीजांकडे मोठमोठी गलबते, गॅले, गॅलेओत, गॅलेआंव अशा नौका तोफांनी व लढाऊ सामग्रीने सिद्ध होत्या. शिवाजी महाराजांना ह्या लढाऊ जहाजांचा सामना करण्यासाठी त्याच पद्धतीच्या नौकांना सुसज्ज करायचे होते. युद्धनौकांच्या बांधणीसाठी त्यांनी कल्याण, भिवंडी आणि पेण इथे कारखाने उभारले. रुय लैतांव व्हियेगश आणि त्याचा मुलगा फेर्नांव व्हियेगश ह्याच्यासह सुमारे तीनशे पोतृगीज व टोपॅझ ह्यांच्याकडून आरमार बांधायला सुरुवात केली. पोर्तुगीज गव्हर्नरांच्या धमक्यांमुळे जरी हे सर्व तंत्रज्ञ पुढे पळून गेले, तरी त्यांच्याकडून मिळालेल्या ज्ञानाच्या जोरावर महाराजांनी आपल्याच लोकांकडून सशस्त्र युद्धनौकांची निर्मिती करून घेतली.

आरमाराच्या रक्षणासाठी महाराजांनी सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग असे मजबूत जलदुर्ग बांधले. कृष्णाजी अनंत सभासद आपल्या बखरीत लिहितो, "पाणियातील म्हणजे केवळ जंजिरे असे करून गड जाहाजे मेळवून दर्यास पालाण राजियांनी घातले(समुद्र काबूत आणला)." जलदुर्गांच्या निर्मितीचे कारण समजावताना सभासद महाराजांनी आरमार कसे सजवले त्याबाबत पुढे लिहितो, "...गुराबा व तरांडी व तारवे, गलबते, शिबाडे, गुराबा, पगार अशी नाना जातीची धाकट जाहाजे करून दर्यासागर म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी शहूर असे दोघे सुभेदार करून, दोनशे जाहाजे एक सुभा, असे आरमार सजले..." ज्याच्याकडे जो वकूब त्याप्रमाणे त्याचे कौशल्य वापरण्यासाठी महाराजांनी प्रत्येकाला संधी दिली. त्यासाठी जातपात, धर्म मनांत आणला नाही. विजयदुर्गाच्या संरक्षणासाठी समुद्राच्या पृष्ठाखालील तळात बांधलेली लांबलचक दगडी भिंत ही स्वराज्याच्या आरमारातील कारागिरांची किमया जगाच्या पाठीवर अद्वितीय ठरावी अशी आहे. ज्या ब्रिटीशांनी महाराजांच्या नौकांना हलक्या व कमी प्रतिच्या म्हणून हिणवले त्या सपाट चिंचोळ्या नौकांनी खांदेरीच्या लढाईत ब्रिटीशांच्या मोठ्या मोठ्या गॅलेओत समुद्रात बुडवल्या. ह्या भारतीय नौका पुढे इतक्या मोठ्या कामागिरी करू लागल्या, की सरखेल कान्होजी आंग्रेच्या काळात मराठ्यांच्या नौदलसामर्थ्याचा सर्वांनी धसका घेतला. आरमारनिर्मितीच्या असामान्य कार्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांना 'भारतीय नौदलाचे जनक' म्हणून संबोधिले जाते.

आरमाराच्या निर्मितीसाठी लाकूड मोठ्या प्रमाणावर लागे. पण शिवरायांनी स्वराज्यातील मुलुखात वृक्षतोडीस मज्जाव केला. आज्ञापत्र स्पष्ट बजावते, "रयतेने ही झाडें लाऊन लेकरासारखी बहुत काल जतन करून वाढविलीं असता, ती झाडें तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावार काये आहे? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल, तें कार्य करणारासहित स्वल्पकार्लेच बुडोन नाहींसेच होतें. किंबहुना धण्याचेच पदरीं प्रज्यापीडणाचा दोष पडतो." स्वराज्यनिर्मितीच्या हरेक कामात लोकसहभाग असावा हा महाराजांचा मुख्य हेतू होता, तरीही त्यामागे प्रजेचे कल्याण आणि स्वराज्याच्या साधनसंपत्तीचे संरक्षण मात्र त्यांनी कधीही नजरेआड केलं नाही.

## शेती, उद्योग, व्यापार, कारखानेः

स्वराज्यातील प्रजा प्रामुख्याने कृषीप्रधान होती. शिवरायांनी सर्वप्रथम प्रत्येक सुपिक जमिन लागवडीखाली आणून कृषिक्रांती केली. शेतीची अवजारे सरकारातून पुरवावीत म्हणून सुतार-लोहारांना कामाला लावून गरीब शेतकर्‍यांना अवजारे पुरवली, मोफत बियाणे, बैल पुरवले. सरकारी जमिनी लागवडीसाठी दिल्या. कधी कधी कर माफ केले. त्यामुळे शेतकरी सक्षम होऊन गावगाड्यातील इतर अलुते-बलुतेदारांना कामे मिळू लागली. स्थानिक उद्योग, व्यापार वाढीस लागावेत ह्यासाठी शिवरायांनी कितीतरी उपाय योजले. कोकणात मीठाचे उत्पादन करणाऱ्यांचे मीठ हे गोव्यातील पोर्तुगीजांच्या मीठापेक्षा कमी प्रतिचे म्हणून स्वस्त भावात विकले जाई. शिवरायांनी गोवा-बारदेशातील पोर्तुगीजांच्या मीठावर भरमसाठ जकात आकारून स्वदेशातील मिठाला भाव आणि मागणी दोन्ही मिळवून दिले. कष्टकऱ्यांच्या घामाचं चीज झालं पाहिजे याबाबतीत महाराज सर्वतोपरी लक्ष पुरवीत.

स्वराज्यकामासाठी शिवरायांनी इथल्या कारागिरांना, उद्योजकांना स्वदेशीबरोबर परदेशी तंत्रज्ञान आत्मसात करून अद्ययावत यंत्रणा उभी केली. इथला व्यापार वाढीस लागावा म्हणून आपली जरब बसवतानाच पोर्तुगीज-इंग्रजांसारख्या देशांबरोबर अरबी देशांशी आवश्यक ते तह-समझोते केले. असे असले तरी स्वराज्यात परदेशी चलनास मात्र त्यांनी मज्जाव केला. सुवर्णहोन आणि तांब्याची शिवराई ह्या चलनांसाठी रायगडावर नाण्यांची टांकसाळ निर्माण केली.

कुशलतेला व कष्टकऱ्यांना वाव मिळावा म्हणून कारभारासाठी बारा महाल व अठरा कारखाने निर्माण केले. कृष्णाजी सभासदाने आपल्या बखरीत ही यादीच दिली आहे. "महाल व कारखानेः १ पोते (कोषागार), २ थट्टी (गोशाला), ३ सेरी (तृप्तिशाला), ४ वहिली (रथशाला), ५ कोठी (धान्यकोठार), ६ सौदागीर (व्यापारशाला), ७ टंकसाळ, ८ दरुनी (अंतःपुर), ९ पागा (अश्वशाला), १० इमारत (बांधकाम विभाग), ११ पालखी, १२ छबीना (रात्रि - संरक्षक विभाग) हे बारा महाल आणि १ खजीना (रोकड शिल्लक), २ जवाहीरखाना (रत्नशाला), ३ आबारखाना (अंबरखाना, हत्तीशाळेतील कोठार), ४ आबदारखाना (जलस्थान), ५ नगारखाना (नौबतखाना), ६ तालीमखाना (व्यायामशाला), ७ जामदारखाना (वस्त्रागार), ८ जिरातेखाना (शस्त्रागार), ९ मुदबखखाना (पाकशाला), १०

शरबतखाना (औषधालय), ११ शिकारखाना (मृगयागृह), १२ दारूखाना (अग्न्यस्त्रगृह), १३ शहतखाना (संरक्षकालय), १४ पीलखाना (हत्तीशाला ), १५ फरासखाना (राहुट्या, डेरे, वगैरे वस्तु ठेवण्याची जागा), १६ उष्टरखाना (उंटशाला), १७ तोफखाना, १८ दप्तरखाना हे अठरा कारखाने." बारा महाल आणि अठरा कारखान्यांच्या ह्या यादीच्या अभ्यासातून शिवाजी महाराजांनी तंत्रज्ञ आणि कौशल्य ह्या कामी एतद्देशीय लोकांचा किती सुदृढ उपयोग केला ते अगदी सहज लक्षात येते.

## आजच्या युगात शिवछत्रपतींच्या विचारांची उपयुक्तता

कोणत्याही समाजाच्या आणि पर्यायाने राष्ट्राच्या उन्नतीसाठी तंत्रज्ञान आणि कौशल्य ह्यांनी परिपूर्ण असलेले मनुष्यबळ अत्यंत गरजेचे असते. काळानुसार नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करीत विविध कार्यात प्राविण्य मिळवणे हे प्रत्येक राष्ट्राचे महत्वाचे उद्दीष्ट असते. शिवकालीन दुर्गबांधणी, शस्त्रनिर्मिती, संपन्न आरमार आणि त्यामागील संरक्षणाची मजबूत व्यवस्था ह्यांचा अभ्यास केला तर आजच्या युगातील संरक्षण दलाच्या छावण्यांना अभेद्य कसे करता येईल ह्याचे मर्म सापडू शकते.

शिवकालीन दुर्गबांधणीत प्रामुख्याने दगड, विटा, चुनखडी, शिसे ह्यांचा वापर केला गेला. ऊन, वारा, पाऊस असे नैसर्गिक मारे झेलताना डोंगरमाथ्यावर किंवा समुद्रात हे दुर्ग शतकानुशतके मजबूत रहावे हा त्यामागे उद्देश होता. क्रॉंक्रीटच्या आजच्या युगात वारंवार डागडुजी करूनही पन्नास-साठ वर्षांपेक्षा इमारती टिकत नाहीत असं अनुभवास येतं. शिवकालीन वास्तुशास्त्राचा उपयोग, त्याकाळचे वास्तुविद्येचे तंत्रज्ञान आजच्या गरजा भागवू शकतील, असे नवीन आयाम उदयाला यायला हवेत. दुर्गांवरील इमारतीत गवाक्षांद्वारे नैसर्गिक वायुविजनाची उत्तम सोय होती. शेणामातीने सारवलेल्या जमिनी कोणत्याही यांत्रिक उपकरणांशिवाय थंडावा निर्माण करीत. साग, शिसम अशा दीर्घकालीन टिकणाऱ्या लाकडांचा उपयोग घरे, महाल, सदरांच्या आतल्या बांधकामात करत. दीडदोनशे वर्षांचा कालावधी लोटला तरी ह्या लाकडांना वाळवी लागत नसे. ह्या लाकडांवरची कलाकुसर आणि तकाकी कुशल सुतारकामाच्या द्योतक होत्या. दीर्घकालीन व नक्षीदार अशा ह्या लाकडी वस्तुंची निर्मिती आजही करता येईल. त्यामुळे शिवकालीन सांस्कृतिक विशेष व कला जपता येतील, फक्त त्याला आधुनिकतेची जोड द्यायला हवी. पावसाचे पाणी वर्षभर साठवता येईल, शुद्ध राहील यासाठी शिवकालीन जलव्यवस्थेच्या बांधकामाचा, बंधारे, धरणे, तलाव, टाकी यांचा अभ्यास केला तर आजही वारंवार पाणीटंचाई झेलणाऱ्या भागांत पाणी साठवण्याचे बांधकाम कसे करायला हवे, भूजलाचे रक्षण कसे करता येईल याचे मार्गदर्शन मिळेल.

काळाच्या ओघात आज बंदुका, रायफल्स, तोफा, मिसाईल, ड्रोन, रणगाडे, बॉम्बस्, जैवनाशके अशा आधुनिक शस्त्रांस्त्रांनी शिवकालीन शस्त्रांस्त्रांची जागा घेतली आहे. परंतु शिवरायांचे शस्त्रास्त्रांविषयीचे विचार मात्र अजुनही उपयुक्तच ठरतात. शस्त्र अद्ययावत असायला हवे. शत्रुंकडे असलेले सारे तंत्रज्ञान आपण मिळवायला हवे. त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतूद केलीच पाहिजे. गरजेनुसार शस्त्रे

व त्याचे तंत्रज्ञान, ज्ञानविज्ञान यांची आयात करावी पण त्याबरहुकुम आपल्याकडेही त्यांची निर्मिती झाली पाहिजे ह्यावर भर द्यायला हवा. शस्त्रास्त्रांच्या बाबतीत परावलंबी असू नये. पर्याप्त शस्त्रसाठा आणि प्रशिक्षित निष्ठावंत सैन्यबल ह्यावरच देशाचे संरक्षण अवलंबून आहे. शिवरायांचे शस्त्रास्त्रांसंबंधीत कृतिशील विचार आजही ह्या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाला प्रेरणादायी ठरतात.

अधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज, विमाने वाहून नेणा-या मोठमोठ्या युद्धनौका, पाणबुड्यांनी समृद्ध अशा आजच्या नौदलाला समुद्रतळाशी युद्धकौशल्य व सागरी संरक्षणव्यवस्थेची जोड देणारे नवे तंत्रज्ञान विजयदुर्गासंबंधीत शिवकालीन विचारावर उभे केले जाऊ शकते.

भारतीय किनारपट्ट्यांवर पारंपरिक मासेमारीचा व्यवसाय आजही चालतो. शिवकालीन नौकांची रचना, वापरले जाणारे लाकूड, खिळे, डोलकाठ्या, मेण, वंगण इत्यादींचा अभ्यास आजच्या मत्स्य व्यवसायासाठी वापरल्या जाणा-या छोट्यामोठ्या नौकांनाही उपयुक्त ठरू शकतो. टिकाऊपणाबरोबर इंधन बचतही सागरी उद्योगात केली जाऊ शकते.

आज काळानुसार मानवी आणि सामाजिक जीवनात अनेक बदल झाले आहेत. नवनवीन ज्ञानविज्ञान, संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरण, डिजिटलायझेशन अशा विविध बाबींनी विकासाचे नवे आयाम प्रस्थापित केले आहेत. शिवकाळातील राहणीमान वेगळे होते. त्यामुळे आज त्याकाळचे सारे तंत्रज्ञान सयुक्तिक होणार नाही. परंतु भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतकरी सक्षम झाला पाहिजे, पारंपारिक लघु उद्योग जपले पाहिजेत, व्यावसायिक कौशल्य टिकवले पाहिजे, सराव आणि प्रशिक्षण यांद्वारे कारागिरांचा विकास केला पाहिजे, देशविदेशातील नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अद्ययावत यंत्रे साधली पाहिजेत, योग्य मोबदला आणि प्रत्येकाचा सन्मान यातून देशाप्रती निष्ठा वाढीस लावली पाहिजे, प्रत्येक हाताला काम देत लोकसहभागातून राष्ट्राची उन्नती केली पाहिजे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आत्मनिर्भरता हे शिवरायांचे कृतिशील विचार आजच्या युगातही संपूर्णतः प्रेरणादायी ठरतात.

शिवाजी महाराजांच्या ह्या कार्याचा, विचारांचा मार्ग अनुसरत आपण समाजातील सर्व क्षेत्रात यत्न करून समर्थ रामदास स्वामींची संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रातील उक्ती सार्थ करायला हवी-

***“आहे तितुके जतन करावे| पुढे आणिक मेळवावे|***
***महाराष्ट्र राज्य करावे| जिकडे तिकडे||”***

## संदर्भ सूची :

१. कृष्णाजी अनंत सभासद विरचित शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर), संपादकः र. वि. हेरवाडकर, व्हीनस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, १९८६

२. आज्ञापत्र, संपादकः रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००५

३. शिवछत्रपतींची पत्रेः खंड १ आणि २, संपादकः डॉ. अ. गो. कुलकर्णी, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, पहिली आवृती, २०११, २०१३

४. शिवछत्रपतींचे आरमार, ग.भा. मेहेंदळे, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, पहिली आवृती, २०१०

५. SHIVAJI: HIS LIFE AND TIMES, ग.भा. मेहेंदळे, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, पहिली आवृती, २०११





■ ■ ■

# नोंदी



११ एप्रिल १८२७ - २८ नोव्हेंबर १८९०

# महात्मा जोतीराव फुले
# उद्योजकीय कौशल्य असलेले समाजसुधारक

### संक्षिप्त परिचय

महात्मा जोतीराव फुले एक क्रांतिकारी समाज सुधारक होते. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. त्यांचे संपूर्ण जीवन संघर्षमय होते. या संघर्षातूनच त्यांचे व्यक्तिमत्व घडले आणि महात्मा म्हणून मान्यता पावले. बालपणीच त्यांना शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. परंतु सर्व अडथळे, अनंत अडचणी यावर मात करीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. उत्तम यश संपादन केले. सरकारी नोकरीचा प्रस्ताव नाकारला आणि समाजसेवेसाठी संपूर्ण जीवन समर्पित करण्याचा खडतर मार्ग स्वीकारला. फक्त लिहिण्या-वाचण्यापुरते त्यांचे शिक्षण सीमित नव्हते. शिक्षणाने त्यांचा वैचारिक दृष्टिकोन प्रगल्भ झाला होता. मोठमोठ्या तत्त्ववेत्यांची पुस्तके त्यांनी वाचली, त्यांचे तत्त्वज्ञान समजून घेतले. छत्रपती शिवाजी

महाराज यांच्यासारख्या थोर महापुरुषांच्या जीवन चरित्राचा अभ्यास केला, त्यातून प्रेरणा घेतली. त्याकाळी असणारी सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रतिकूल परिस्थिती हीच त्यांच्या महात्मा होण्यास कारणीभूत ठरली. ह्या विषम परिस्थितीसाठी, गुलामगिरीसाठी फक्त आणि फक्त अज्ञान, अविद्या हेच प्रमुख कारण आहे, असे त्यांचे ठाम मत झाले. त्यांनी शिक्षण क्षेत्रातूनच समाजसेवेची सुरुवात केली. १ जानेवारी १८४८ साली त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली, नंतर अस्पृश्यांसाठी आणि नंतर प्रौढांसाठी शाळा सुरू केली. चार वर्षात त्यांनी एकूण १३ शाळा सुरू केल्या. मुलींसाठी आणि अस्पृश्यांसाठी सर्वप्रथम शाळा सुरू करणारे महापुरुष जोतीराव फुले हेच होते.

***स्त्री पुरुष सर्व ||कष्टकरी व्हावे || कुटुंबा पोसावे आनंदाने ||***

महात्मा फुले हे स्त्री-पुरुष समानतेचे कट्टर पुरस्कर्ते होते. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडण्यास देखील परवानगी नव्हती अशा काळात स्त्रियांनी शिकावे, घराबाहेर पडावे, पतीच्या खांद्याला खांदा लावून काम करावे आणि आपल्या कुटुंबाचे पोषण करावे. ते फक्त विचार व्यक्त करून थांबले नाहीत तर त्याची सुरुवात त्यांनी स्वतःपासूनच केली. त्यांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना स्वतःच शिकविले आणि त्यांनाच शिक्षिका बनवून मुलींच्या शाळेत शिकविण्यास सांगितले. एवढेच नव्हे तर त्या काळात सावित्रीबाईंना सहा महिने नगर येथे प्रशिक्षणासाठी पाठविले. सावित्रीबाई फुले या पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका झाल्या. पुढे त्या शाळेच्या मुख्याध्यापिका झाल्या. अशा प्रकारे आपल्या देशातील सर्वात पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका आणि मुख्याध्यापिका बनण्याचा सन्मान त्यांना मिळाला.

## महात्मा फुले यांचे व्यवसाय शिक्षण आणि कौशल्य शिक्षण याविषयी शैक्षणिक कार्य

**मेकॉलेच्या शैक्षणिक धोरणाला विरोध-** महात्मा फुले यांनी मेकॉलेच्या शैक्षणिक धोरणाला कडाडून विरोध केला. लिखित स्वरूपात त्यांनी त्यांचा विरोध दर्शविला होता. भारताच्या भवितव्यासाठी हे धोरण घातक आहे असे म्हणत **फिल्टरेशन थेअरी**ला जोरदार विरोध केला. आजच्या युगात आपल्या भारत सरकारने ते धोरण पूर्णपणे मोडीत काढत आपली स्वतःची शिक्षण पद्धती अमलात आणली आहे. शिक्षण वरून खाली पाझरत यावे या ऐवजी आधी पाया मजबूत करा व नंतर त्यावर इमारत उभी करा, असे त्यांचे स्पष्ट मत होते. म्हणजेच प्राथमिक शिक्षणासाठी सरकारने जास्तीत जास्त प्रयत्न करावे. शिक्षण सर्व घटकांसाठी म्हणजेच मागास, अतिमागास, बहुजन व उच्चवर्णियांसाठी सुद्धा सक्तीचे करावे, अशी त्यांची मागणी होती.

**प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे असले पाहिजे अशी मागणी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.** "I think primary education of masses should be made

compulsory up to certain age say at least 12 years."

## महात्मा फुले यांचे कौशल्यविषयक दृष्टिकोन, मते आणि भरीव कार्य

व्यवसाय शिक्षण, तंत्रशिक्षण व कौशल्य विकसित करणाऱ्या शिक्षणाची मागणी करणारे निवेदन हंटर कमिशन समोर महात्मा फुले यांनी लिखित स्वरूपात दिले होते. बालवयातच विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये शिकविली पाहिजेत, व्यवसाय शिक्षण, तंत्रशिक्षण व शेती यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे, असे महात्मा फुले यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळेच १९ ऑक्टोबर १८८२ रोजी जेव्हा **हंटर कमिशन** भारतात आले तेव्हा त्यांनी लेखी निवेदन देऊन मागणी केली-

'But as the public service can afford no field for all educated natives who come from schools and colleges and more over the course of training they received being not of a **technical or practical** nature, they find great difficulties in betakiing themselves to other manual or remeunerative employments.'

सरकारी नोकऱ्यांमध्ये अत्यंत कमी जागा उपलब्ध आहेत. शाळा आणि कॉलेजमधून शिकलेल्या सर्व तरुणांना सरकारी नोकरी मिळू शकत नाही. बहुतांशी सर्वच जागा भरल्या गेल्या आहेत. त्यामुळे शिकलेल्या तरुणांकडे रोजगार नाही. शाळेतून आणि कॉलेजमधून फक्त शिक्षक आणि कारकून घडविणारे शिक्षणच दिले जात आहे. **त्यांना व्यवहार्य म्हणजेच व्यवसायात उपयोगी पडेल असे शिक्षण दिले गेले पाहिजे.** आजच्या घडीला शिक्षित असूनसुद्धा ते रडत आहेत. व्यवसाय शिक्षण विद्यार्थ्यांना बालवयातच दिले गेले पाहिजे. सरकारने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये **कौशल्य विकास होईल असे शिक्षण दिले पाहिजे** विविध व्यवसायांची कौशल्ये शिकवून त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे.

'Hence the cry that the market is overstocked with educated natives who do not find any remunerative employment.'

महात्मा फुले यांनी हंटर कमिशनकडे जे निवेदन दिले त्याच्या कितीतरी आधीपासून स्वतःच्या शाळांमधून व्यवसाय शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली होती. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळांमध्ये येणारी सर्वच मुले गरीब आणि मागास कुटुंबातील होती. त्यांना गोळा करताना लक्षात असे आले की, ही सर्व मुले त्यांच्या वडिलांना त्यांच्या वडिलोपार्जित व्यवसायात, कामात मदत करीत असतात. कुणी लोहारकाम करीत होते, तर कोणी कुंभारकाम, कोणी टोपल्या विणीत होते, तर कोणी गवंडीकाम, कोणी पादत्राने करण्यास मदत करीत होते, तर कोणी जंगलात गेले होते मेलेल्या जनावराची कातडी काढण्यासाठी! हे सर्व लक्षात आल्यानंतर या मुलांना त्यांच्या कामातून काढून शाळेत आणणे अवघड

तर आहेच; पण त्याहीपेक्षा व्यवसाय शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. ते शिक्षण शाळेतूनच दिले पाहिजे असा पक्का निर्धार महात्मा फुले यांनी केला. त्या सर्व विद्यार्थ्यांना घेऊनच त्यांनी एक योजना तयार केली. शालेय शिक्षणासोबत त्या विद्यार्थ्यांना आठ दिवस मातीकाम करण्यासाठी प्रत्यक्ष कुंभाराकडे, पुढचे आठ दिवस प्रत्यक्ष लोहारकाम, पुढचे आठ दिवस बांधकाम असे प्रशिक्षण सुरू केले. सर्वच मुले सर्व प्रकारची कामे शिकू लागली. त्यामुळे त्यांचे पालकही खुश झाले. प्रत्यक्ष सुताराकडे, लोहाराकडे, गवंडयाकडे, कुंभाराकडे, चर्मकाराकडे, मांग वस्तीत टोपली, सुप तयार करणाऱ्याकडे, शिंप्याकडे प्रत्यक्ष कामे, कौशल्य शिकायला जाऊ लागली. शिक्षणासोबतच व्यवसाय शिक्षण सुरू झाले. त्यांनी कौशल्य विकसित केली. सर्वच जरी नोकरीला लागली नसती तरी व्यवसाय, उद्योग- धंदे ही मुले करू शकत होती. सध्या देशात देण्यात येणाऱ्या शिक्षणात **तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाचा अंतर्भाव नाही** त्यामुळे विद्यार्थी त्यांच्या भावी आयुष्यात स्वतंत्रपणे उदरनिर्वाह करणेयोग्य राहत नाही असे स्पष्ट मत हंटर कमिशनसमोर त्यांनी मांडले होते.


'The course of studies prescribed has no practical element in it, so as to fit the pupil for his future career in independent life. Lessons of technical education and morality, sanitization and agriculture of and some useful art should be interpersed among them in progressive series.'

शालेय आणि महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमात तंत्रशिक्षण, नीतीमूल्ये, आरोग्य, शेतकी आणि विविध स्वयंरोजगार करता येतील अशी कला, कौशल्ये या विषयावरील पाठांचा अंतर्भाव टप्प्याटप्प्याने करावा, असे स्पष्ट मत आपल्या निवेदनातून महात्मा फुले यांनी हंटर कमिशन समोर मांडले होते. महत्त्वाचे म्हणजे हे निवेदन देण्यापूर्वी महात्मा फुले स्वतःच उद्योगपती म्हणून यशस्वी झाले होते. त्यांनी 'पुना कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग' कंपनी सुरू केली होती. त्यामुळे त्यांना विविध कुशल कामगारांची नितांत आवश्यकता व त्यांचे महत्त्व समजले होते. ज्यांना नोकरी नाही, ज्यांचेकडे शेतीवाडी नाही अशांसाठी उदरनिर्वाहाचा सर्वोत्तम मार्ग ज्यामध्ये विपुल पैसा आहे असे त्यांचे मत झाले.

## उद्योगपती महात्मा ज्योतिराव फुले यांचे भरीव कार्य

***नम्र होऊनिया रक्षा सौजन्यास || झटा उद्योगास || निषिदिनी ||***
***बुद्धीप्रामाण्याने उद्योगा लागती|| यश मिळविती ||धंद्यांमध्ये || महात्मा फुले***

महात्मा जोतीराव फुले यांनी **पुना कमर्शियल कॉन्ट्रॅक्टींग कंपनी** सुरु केली होती. ते ह्या कंपनीचे कार्यकारी संचालक होते. या कंपनीने अनेक मोठमोठे बांधकाम केले. कात्रजचा बोगदा, बंडगार्डनचा पूल, खडकवासला धरणाचा डावा कालवा यांचे बांधकाम पुन्हा कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी यांनीच केले. जे आजही त्यांच्या कामाचा दर्जा सांगतात.



Poona Commercial & Contracting Company
Poona Vetal Pet 1st January 1879

The Bearer Gaunoo Krustnajee Susaney has served us nearly four months as a Purchaser in the Vegetable Market. Although he was not brought up in school still he writes a very good Mode Marathi hand We always found him punctual & diligent

Jotirao Govindrao Phooley
for Poona Coml & Contg Co.

Jotirao's Handwriting

## महात्मा फुले यांचे इंग्रजी हस्ताक्षर

मुंबई महानगरपालिकेची सुंदर इमारत त्यांचेच भागीदार सत्यशोधक समाजाचे श्री. कालेवार यांनी बांधली. त्यांच्या कंपनीनेच फुले मंडईसुद्धा बांधली.

रामय्या व्यंकय्या आय्यावारू महात्मा फुले यांचेच भागीदार होते, सहकारी होते व सत्यशोधक समाजाचे सदस्य होते. त्यांनी भंडारदरा धरण, बडोद्याचा लक्ष्मी विलास पॅलेस व राजवाडे असे अनेक बांधकाम केले.

जाया लिंगू हे महात्मा फुले यांचे भागीदार होते व सहकारीही होते. त्यांनी १८९७ यावर्षी भायखळा पूल व परेलचे रेल्वे वर्कशॉप बांधले. महात्मा फुले यांचे एक सहकारी राजू बाबाजी यांनी टाईम्स ऑफ इंडियाची इमारत बांधली. लक्ष्मी विलास मिल सारख्या अनेक गिरण्यांचे बांधकाम केले. बांधकाम क्षेत्रात अप्रतिम बांधकाम आणि त्यांचा दर्जा यामुळे 'पुना कमर्शियल अँड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी' चे मोठे नाव झाले होते.

त्यांच्या ह्याच कंपनीने भाजीपाला, फळे, फुले इत्यादी निर्यात करण्याचे व्यवसायसुद्धा केले होते. सोन्याचे दागिने करण्यासाठी जे साचे लागतात ते विदेशातून येत होते. त्यांची एजन्सी महात्मा जोतीराव फुले यांच्याच कंपनीकडे होती. असे साचे भारतातच तयार व्हावे, ते करणारे कुशल कारागीर साचेकार (Moulder) भारतातच निर्माण व्हावे असे त्यांना वाटे. म्हणून व्यवहार्य आणि तांत्रिक शिक्षण देण्याची मागणी महात्मा फुले यांनी हंटर कमिशनकडे केली. पुस्तक प्रकाशनाचा सुद्धा व्यवसाय त्यांच्या कंपनीमार्फत केला जात होता. गौतम बुद्धांच्या वज्रसूची या ग्रंथाची मराठी आवृत्ती तुकाराम तात्या पडवळ यांनी लिहिली. १८६५ साली तो ग्रंथ **जातीभेद विवेक सार** या नावाने प्रकाशित करण्याचे काम त्यांच्याच कंपनीने केले.

महात्मा फुले यांना शेअर मार्केटचे सुद्धा उत्तम ज्ञान होते. शेअर्समध्ये गुंतवणूक करावी, पैसे कमवावे, नफा कमवावा आणि सत्कर्म सुद्धा करावे, असे प्रेरणा देण्याचे काम (मोटिवेट) महात्मा फुले यांनी केले. त्यांच्या त्या काळात शेअर्स बाजारात त्यांचे अनेक सहकारी सक्रिय झाले. शेअर्स व्यवहारावर त्यांचे विचार त्यांच्या अखंडातून कविता करून व्यक्त केलेले आहेत. शेअर्सवर १८६९ यावर्षी कविता केली.

***शेअर घेणाऱ्यास गळी घाल दोरी ||***
***पावतीत सारी ||जडीबुट्टी ||***
***पैसे बुडाल्यास नाहीत त्यास दाद ||***
***सुका आशीर्वाद|| कशासाठी||... म. फुले***

शेअर्समध्ये गुंतवणूक करताना पावती नक्की घ्यावी, यातच समजुतदारपणा आहे. फसवणुकीवरचा हाच एक उपाय आहे, अन्यथा पैसे बुडाल्यास दाद मागता येत नाही. कोरडे गोड बोलणे, खोटी आश्वासन देणे, खोटा विश्वास हा कशासाठी असे ते विचारतात.

*शेअर मार्केटात खप कागदाचा ||*
*नफा दलालाचा || बुडे धन्य ||*
*शेअर कागदास पाहून रडती ||*
*शिव्या शाप देती || योजी त्यास ||*
*शेअर्स काढून उद्योग काढणे ||*
*हिशोब ठेवणे || रोजकीर्द ||*
*खतावणी सर्व बिनचूक ठेवी ||*
*नफा तोटा दावी ||शोधी त्यास ||*

शेअर्सच्या व्यवसायात खतावणी, रोजकीर्द हे बिनचूक ठेवावे. त्यांचा हिशेब ठेवावा आणि जर नफा तोटा झाला तर तो सर्व जगास दाखवावा. जेणेकरून इतर लोक सुद्धा प्रेरणा घेतील. आणि शेअर्स मार्केटमध्ये सक्रिय होतील, असा मोलाचा सल्ला महात्मा फुले कवितेतून देतात. शेअर्सच्या माध्यमातून भारतीय उद्योजक तयार व्हावे, असा त्यांचा आग्रह होता.

## महात्मा फुले यांचे कौशल्यविषयक चिरंतन विचार आणि द्रष्टेपण

***बुद्धी प्रामाण्याने, उद्योगा लागती || यश मिळविती || धंद्यामध्ये ||.... म. फुले***

ज्यांनी ज्यांनी बुद्धिप्रामाण्यानुसार व्यवसायाचे ज्ञान मिळविले, कौशल्ये शिकली आणि स्वतःचे उद्योगधंदे सुरू केले, व्यवसाय सुरू केला अशी माणसे यशस्वी झाली. त्यांचे जीवन सुखी झाले, असे विचार महात्मा ज्योतिराव फुले आपल्या अखंडातून व्यक्त करतात. स्वतःचे व्यवसाय सुरू करावे, उद्योग उभारावे आणि सचोटीने, इमानेइतबारे आपली प्रगती साधावी. इतरांनाही काम द्यावे आणि त्यांचे जीवनमान सुखी करावे, असे महात्मा फुले आग्रहपूर्वक सांगत. ते स्वतःच एक यशस्वी उद्योगपती होते. त्यांनी अनेक उद्योग सुरू केले होते. त्याकाळी ते सरकारच्या तिजोरीत सर्वात जास्त इन्कम टॅक्स भरणाऱ्यांपैकी एक होते.

*सत्य उद्योगाने रोग लया जाती || प्रकृती होती बळकटा ||*
*उल्हासित मन, झटे उद्योगास || भोगी संपत्तीस || सर्वकाळ ||*

सचोटीने व सत्याने उद्योग धंदे केल्यास, व्यवसाय केल्यास मेहनतीने आणि परिश्रमामुळे प्रकृती सुद्धा बळकट होते, आपले आरोग्य उत्तम राहते. मन प्रसन्न राहते. आर्थिक परिस्थिती उत्तम राहते, आणि त्यामुळे संपत्तीचा छान उपभोग घेऊ शकतो. आपल्या कुटुंबास सुखात ठेवू शकतो. समाजसेवा, दानधर्म करू शकतो असा उपदेश ते आपल्या लिखाणातून देतात.

महात्मा फुले हे दूरदृष्टी असणारे समाजसुधारक होते. त्यांचे विचार हे चिरंतन टिकणारे होते. दोनशे वर्षांपूर्वी त्यांनी केलेले चिंतन आजदेखील तेवढेच लागू होते, किंबहुना जी आज आपली गरज आहे त्याचा विचार त्यांनी त्याच वेळेस केला होता आणि उपायसुद्धा सांगितला होता. **सर्वांना सरकारी नोकरी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे स्वतःचा व्यवसाय करता येईल, उद्योग निर्माण करता येईल, विविध कौशल्य विकसित होतील असे शिक्षण देण्यात यावे,** अशी मागणी त्यांनी हंटर कमिशनकडे केली होती. आजही तीच परिस्थिती आहे. रोजगार आणि स्वयंरोजगार याविषयी त्यांचे विचार आजही तंतोतंत लागू होतात.

शेतीविषयक दृष्टिकोन बदलला पाहिजे. त्यात नवीन नवीन संशोधन झाले पाहिजे. भाजीपाला, फळे, फुले इत्यादी शेतकऱ्यांची उत्पन्न इम्पोर्ट-एक्स्पोर्ट करण्याचा उद्योग शेतकऱ्यांनीच एकत्र येऊन सुरू केला पाहिजे. **नवनवीन तंत्रज्ञान शेतीमध्ये आली पाहिजेत, नवीन साधने आली पाहिजेत हे आजही तेवढेच लागू होते. पाणी बारीक तोटी असणाऱ्या नळांतूनच दिले पाहिजे जे बंद करता येतील, अशा प्रकारे पाण्याचे नियोजन आजही तेवढेच परिणामकारक आहे.**

शिष्यवृत्तीचा लाभ घेतल्यानंतर सक्षम व्हावे, समर्थ व्हावे. समर्थ झाल्यानंतर आपण स्वतः शिष्यवृत्तीचा त्याग करावा, जेणेकरून ज्याला नितांत गरज आहे त्याला ती शिष्यवृत्ती मिळेल आणि त्याचा उद्धार होईल, असा विचार करणारी व्यक्ती, त्यांचा दृष्टिकोन, त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतो.

१ एप्रिल २०१० रोजी भारत सरकारने **शिक्षण हक्क कायदा** लागू केला. याची बीजे महात्मा फुले यांच्या १८८२ साली हंटर कमिशन समोर दिलेल्या निवेदनात दिसून येतात. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे व्हावे, अशी मागणी त्यांनी हंटर कमिशनकडे त्याकाळी केली होती.

महाराष्ट्र शासनातर्फे आयटीआयमध्ये राबविण्यात येणारी **ऑन जॉब ट्रेनिंग (OJT)** योजना सुद्धा त्यांनी त्याकाळी त्यांच्या शाळांमधून राबविली होती. म्हणजेच त्यांचे ते विचार आजही तेवढेच लागू होतात.

## ऑन जॉब ट्रेनिंग (ओजेटी)

**'ओजेटी'** अर्थात ऑन जॉब ट्रेनिंग महाराष्ट्र शासनातर्फे आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन योजना आहे. या योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थी आपल्या प्रशिक्षण कालावधीमधील काही काळ कंपनी, वर्कशॉप किंवा आस्थापना अशा ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष काम करीत असतात. मोठ्या शहरांमध्ये एमआयडीसी असेल तर तेथील कंपन्यांमध्ये टर्नर, फिटर, वेल्डर, मोटर मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक या व्यवसायांचे प्रशिक्षणार्थी प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतात. बाजारात आलेली नवीन टेक्नॉलॉजी व नवीन मशिनरी यांच्याशी त्यांचा परिचय होतो व ती टेक्नॉलॉजी किंवा

मशीन हाताळण्याचे कौशल्य शिकतो. ज्या ठिकाणी एमआयडीसी नसेल अशा ठिकाणी मोठे वर्कशॉप, अधिकृत सर्विस सेंटर, शोरूम, एसटी वर्कशॉप, रेल्वे स्टेशन, रेल्वे वर्कशॉप, पोलीस वायरलेस अशा ठिकाणी प्रशिक्षणासाठी जात असतात. त्यामुळे प्रशिक्षण जास्त परिणामकारक होते. या कालावधीतच विद्यार्थ्यांना फॅक्टरीमध्ये कशी वर्तवणूक असली पाहिजे, वेळेचे काय बंधन असते, काम करताना सुरक्षितता कशी पाळावी याचे देखील प्रशिक्षण मिळते.

देशभर सुरू असणारी भारत सरकारची मोफत मध्यान्न भोजन योजना त्या काळात महात्मा फुले यांनी सुचविली होती. आपल्या अखंड या काव्यातून ते मांडतात,

***नित्य मुली मुला शाळेत घालावे ||***
***अन्नदान द्यावे || विद्यार्थ्यांना ||***

मुला- मुलींना शाळेत घालावे आणि ते नियमित यावे म्हणून विद्यार्थ्यांना शाळेतच भोजन दिले पाहिजे, जेणेकरून त्यांचा उत्साह राहील, गळती होणार नाही. इंग्रज सरकारने आणि समाजातील दानशूर व्यक्तींनी विद्यार्थ्यांना शाळेतच भोजन मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. त्यांचा भोजनाचा प्रश्न मिटला तर त्यांची शाळेतील उपस्थिती वाढेल. पर्यायाने शिक्षणापासून ते वंचित राहणार नाहीत.

शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन कंपनी काढावी व त्यामार्फत आपला भाजीपाला, फळे, फुले निर्यात करावे. मोठ्या शहरांमध्ये सुद्धा पाठवावी अशी त्यांची संकल्पना पुढे **ग्रुप फार्मिंग** च्या नावाने आजही महत्त्वाची ठरते.

## संदर्भ -


१. महात्मा फुले समग्र दर्शन- महाराष्ट्र शासन.

२. महात्मा जोतीराव फुले- श्री. धनंजय कीर

३. महात्मा जोतीराव फुले- श्री. हरी नरके


■ ■ ■

# नोंदी



२३ जुलै १८५६ - १ ऑगस्ट १९२०

# लोकमान्य टिळक 'धंदेशिक्षणा'चे पुरस्कर्ते

## संक्षिप्त परिचय

बाळ गंगाधर टिळक हे नाव उच्चारले की, त्यामागे आपोआपच लोकमान्य ही त्यांच्या सन्मानाची पदवी आपोआपच उच्चारली जाते. पण ते जेव्हा अजून लोकमान्य म्हणून ओळखले जात नव्हते तेव्हाही त्यांनी प्रत्यक्षात लोकमान्यत्व प्राप्त केलेलेच होते. आपल्या सामाजिक आयुष्यात त्यांनी सर्वप्रथम काय केले तर न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. वर्ष होते १८८०. त्यानंतर चारच वर्षांनी म्हणजे १८८४ मध्ये त्यांनी गोपाळ गणेश आगरकर, वा. शि. आपटे, महादेव शिवराम गोळे, वासुदेवराव केळकर आदींच्या साह्याने डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. कॉलेज सोडले आणि कॉलेज निर्माण केले, या वयातलेच हे सगळे होते. १ जानेवारी १८८५ रोजी त्यांनी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. कॉलेज स्थापन करताना या सर्वांनी दोन महत्वाचे निर्णय घेतले. सर्व शिक्षण इंग्रजीऐवजी देशी भाषांतून देणे

आणि शिक्षणाच्या पद्धती इंग्लंडहून न मागविता येथेच तयार करणे, हे ते निर्णय. त्यांनी त्यासाठी देशी भाषातून सोपी पुस्तके लिहिण्याचा संकल्प सोडला. आगरकर हे इतिहास आणि तत्वज्ञान शिकवायचे, तर टिळक संस्कृत आणि गणित. खुद्द टिळकांनी यंत्रशास्त्रावर पुस्तक लिहिले आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीने ते प्रसिद्ध केले. हेच पुस्तक प्रथम इंग्रजीत त्यांनी लिहिले होते. त्याचे नाव 'मॅट्रिक्युलेशन मेकॅनिक्स' असे होते. त्यांचे हे पहिलेच पुस्तक. टिळकांनी त्याआधी आगरकर आणि विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या साह्याने मराठीत केसरी आणि इंग्रजीमध्ये मराठा ही वृत्तपत्रे सुरु केली. ते वर्ष होते १८८१. अतिशय लहान वयात त्यांनी केलेली शिक्षणविषयक कामगिरी तर अपूर्वच होती. १८८१ मध्ये टिळक आणि आगरकर यांना झालेली पहिली शिक्षा त्यांच्या केसरी आणि मराठामधील लेखनावरून झाली होती. त्यानंतर टिळकांना १८९७ मध्ये राजद्रोहाच्या आरोपाखाली १८ महिन्यांच्या कैदेची, तर १९०८ मध्ये राजद्रोहाच्याच आरोपाखाली ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाली. तेव्हाच्या ब्रह्मदेशात (सध्याच्या म्यानमारमध्ये) असलेल्या मंडालेच्या तुरुंगात त्यांना ठेवण्यात आले. या शिक्षेचा त्यांनी सदुपयोग करून गीतारहस्य या अपूर्व ग्रंथाची निर्मिती केली. जवळपास नऊशे पानांचा हा ग्रंथ त्यांनी अवघ्या वर्षभरातच पूर्ण केला. याच तुरुंगात त्यांनी जर्मन, फ्रेंच आणि पाली भाषा शिकून घेतल्या. १९१४ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर टिळक स्वस्थ बसले नाहीत. डिसेंबर १९१६ मध्ये त्यांनी लखनौ शहरात भरलेल्या काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि ते (स्वराज्य) मी मिळवणारच', ही घोषणा केली आणि स्वराज्याच्या लढाईस चालना दिली. ब्रिटिशांविरूद्धच्या संघर्षात ठामपणे उभे राहिलेले टिळक हे पहिले राष्ट्रीय नेते होत.

## धंदेशिक्षण ते व्यावसायिक प्रशिक्षण

लोकमान्य टिळकांनी सामान्य माणसांमागे आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. त्यांच्या भाषणांमधून आणि त्यांच्या लेखनामधून त्याची प्रचिती आपल्याला येते. स्वराज्य हे सर्वांना बरोबर घेऊन जाणारे असले पाहिजे, या मतावर ते ठाम होते. राष्ट्रीय शिक्षण हे सर्वांसाठी आणि मोफतच हवे, या मताचा त्यांनी वारंवार प्रचार केला. राष्ट्रीय शिक्षणाच्या उद्देशानेच त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ गणेश आगरकर यांच्या सहकार्याने न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. १८८० मध्ये सुरु झालेली ही शाळा पहिल्या वर्षातच नावारुपाला आली. या शाळेत छडीचा वापर कधीच केला जाणार नाही, याबाबत तिघांमध्ये एकमत होते. ज्याला ज्या पद्धतीच्या शिक्षणात रस आहे त्याला ते मिळाले पाहिजे याबाबत टिळकांचा विशेष आग्रह होता. न्यू इंग्लिश स्कूल सुरु झाले, त्याच्या पुढल्याच वर्षी त्यांनी 'केसरी' आणि 'मराठा' यांचे प्रकाशन सुरु केले. टिळकांचे वैशिष्ट्य असे की, त्यांना सुरुवातीच्या काळात खिळेजुळारी (कंपोझिटर) मिळायची मारामार होती, तेव्हा काही काळ त्यांनी स्वतःच खिळे जुळवण्याचे शिक्षण घेऊन वृत्तपत्राची पानेही रचली. या खिळ्यांच्या गॅल्या (लोखंडी पाट्या) खांद्यावरून वाहून

नेण्यात त्यांनी कमीपणा मानला नाही. इतकेच काय पण केसरीची छपाई मोठ्या आकारात करायला लागल्यानंतर त्यांनी जर्मनीहून मागवलेले छपाई यंत्र स्वतःच जुळवले आणि नंतर महिन्याभराने आलेल्या जर्मन तंत्रज्ञास चकित केले. त्यावेळी जर्मन भाषेचा गंध नसतानाही त्यांनी त्या यंत्राबरोबर आलेले नकाशे पाहून हे यंत्र स्वतः उभारले. त्यावरूनच त्यांनी धंदेशिक्षणास काय महत्व आहे ते आपल्या लेखांमधून आणि राष्ट्रीय शिक्षणाविषयी विविध ठिकाणी केलेल्या भाषणांमध्ये स्पष्ट केले.

सर्व जातीधर्माच्या विद्यार्थाना न्याय देते ते शिक्षण आम्हाला हवे आहे. राष्ट्रीय शिक्षण केवळ विशिष्ट वर्गाकरता असता कामा नये, अंत्यजाला तेच आणि चर्मकारांना आणि सोनारांनाही तेच दिले गेले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी गायकवाड वाड्यातील गणेशोत्सवात १४ सप्टेंबर १९०७ रोजी केले होते. एखाद्याकडे बुद्धी कमी जास्त असली तरी सर्वांवर राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटला पाहिजे आणि ते राष्ट्रीय शिक्षणावाचून व्हायचे नाही. व्यापाराच्या बाबतीत इंग्लंड पार लयाला गेले होते तसे शिक्षण आपल्याकडे नको आहे. त्यानंतर इंग्लंड सर्वत्र चरत होते आणि जर्मनी भीक मागत होती. पुढे जर्मनीने प्रयत्नपूर्वक तो देश पुढे नेला तेव्हा इंग्लंडने पुन्हा प्रयत्नांची पराकाष्टा केली. जर्मनी किंवा जपान असे का, तर तिथे उद्योगप्रियता वाढली. त्याचे शिक्षण तिथे मिळू लागले. त्या आधी जर्मनीचे बस्तान बिघडले होते, आता आपले बस्तान बिघडले आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते. आपले हित आपल्याला पाहता आले पाहिजे. म्हणजे काय तर इथे वेगवेगळ्या वस्तू तयार झाल्या पाहिजेत. त्यांची परदेशांमधून आयात बंद झाली पाहिजे, त्यासाठी तर अशा वस्तूंवर बहिष्कार हवा, असेही त्यांनी त्याच सभेत स्पष्ट केले. धंदेशिक्षण हवे म्हणून उद्या फर्ग्युसन कॉलेजात ते दिले जाईलही, पण तेवढ्याने ते राष्ट्रीय शिक्षण होत नाही. त्यासाठी हरतऱ्हेच्या धंदेशिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हायला हव्यात, या शब्दांमध्ये त्यांनी आपला भर कोणत्या शिक्षणावर आहे ते स्पष्ट केले होते.

काँग्रेस पक्षांतर्गत लोकशाही स्वराज्य (नॅशनल डेमॉक्रटिक) पक्ष स्थापन केल्यावर त्यांनी आपल्या पक्षाची जी धोरणे जाहीर केली होती, त्यात शेतीतील आणि कारखान्यातील मजुरांना त्यांच्या कामाचे योग्य दाम दिले गेलेच पाहिजे, असा आग्रह धरला होता. मजुरांकरता चाळींची सोय करणे, रेल्वेची व्यवस्था कंपन्यांकडून काढून घेऊन ती राष्ट्राच्या ताब्यात देणे, देशात औद्योगिक पुनरूज्जीवन होईल अशा रीतीने रेल्वेच्या भाड्याचे दर ठरविणे, वेठबिगारीस संपूर्ण मनाई करणे, लष्कर, आरमार आणि अवकाशयान विद्या यांच्या शिक्षणाची तरतूद करणे आणि भाषावार प्रांतरचना करणे, या मुद्द्यांचा समावेश होता. मुले आणि मुली यांना सर्व शिक्षण मोफत आणि सक्तीने देणे, हाही त्यांनी आपल्या धोरणाचा एक भाग मानला.

लोकमान्य टिळकांनी केसरीच्या पहिल्या काही अंकांमधून सामान्य माणसाविषयी विशेषतः शेतकरी वर्गाविषयी विशेष आस्था दाखवली. ज्यांचे हातावर पोट आहे अशा वर्गाविषयी त्यांनी अधिक आपुलकीने लिहिलेले आहे. केसरीचे पहिल्या काही वर्षांचे संपादक जरी गोपाळ गणेश आगरकर असले तरी त्यात

टिळक, विष्णूशास्त्री चिपळूणकर, वामन शिवराम आपटे हेही लिहित असत. केसरीच्या १५ फेब्रुवारी १८८१ च्या अंकात टिळकांनी बहिष्काराचे समर्थन करणारा लेख लिहिला होता. त्यात त्यांनी बहिष्कार हे असे शस्त्र आहे की, ज्याने नाक तर दाबले जाईलच, पण राज्यकर्त्यांचा जीव घुसमटून त्यांना पळ काढावा लागेल अशी अवस्था निर्माण होईल. हे सांगताना त्यांनी आयर्लंडमध्ये तेव्हा चालू असलेल्या आंदोलनांचा उल्लेखही केला होता. अर्थात त्यासाठी समाजमन तयार होण्याची आवश्यकता आहे हे त्यांनी ओळखले होते. समाजमन तयार व्हायचे तर त्याला घरचे स्वास्थ्य आवश्यक आहे. ते कसे मिळणार, तर त्याच्या हातांना काम हवे आणि त्याचे कुटुंब चालावे अशी स्थिती उत्पन्न व्हायला हवी. म्हणूनच त्यांनी 'समाइकीने उभारलेल्या भांडवलाचे कारखाने' असा लेख पहिल्या काही अंकांमध्येच लिहून त्यात या अवस्थेचे अवस्थेचे वर्णन केले होते. त्यात ते लिहितात, 'देश सधन असो की निर्धन, जित असो वा अजित, लोकसंख्येच्या मानाने म्हणजे हलक्या दर्जाचे म्हणजे काबाडकष्ट करून निर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या जास्त असावयाची. याकरिता या समाजाची स्थिती जोपर्यंत सुधारत नाही तोपर्यंत देशस्थिती सुधारली असे कधीही म्हणता येणार नाही.' त्यासाठी त्यांची व्याख्याही तयार होती. देश म्हणजे शेतकरी, देश म्हणजे काबाडकष्ट करणारी जनता. शेतकरी हा देशाचा आत्मा. सलग चाळीस वर्षे ते आपल्या केसरीच्या माध्यमातून हेच समाजाला सांगत होते.

त्यासाठी तर त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाच्या आवश्यकतेवर भर दिला होता. राष्ट्रीय जीवनात जसे जात, त्याचा धर्म, त्याचा वर्ण हे जसे येता कामा नये, तसेच राष्ट्रीय शिक्षणातही प्रत्येकाचा धर्म, वर्ण किंवा त्याची जात विचारायची पद्धत असता कामा नये. प्रत्येक व्यक्तीला त्याचा आपला मनोविकास व आपल्या सामर्थ्याचा विकास करण्याची संधी जाति, वर्ण, धर्म निरपेक्ष मिळाली पाहिजे, असे टिळक वारंवार आपल्या लेखनातून आणि भाषणांमधून सांगत असत. पंढरपूर येथे १५ नोव्हेंबर १९०७ रोजी झालेल्या सभेत टिळक यांनी तेव्हाच्या शिक्षण पद्धतीतील त्रुटींवर बोट ठेवले. ते म्हणाले, 'संमेलनांचा हेतू काय, तर वक्त्यांचे विचार सर्वत्र पसरून खेड्यापाड्यांमधील लोकांनाही ते कळावेत. सुशिक्षित, अशिक्षित, ज्ञानी व अज्ञानी यांनी एकत्र येऊन कामाला लागावे हा अशा भाषणांचा हेतू असतो. खेड्यापाड्यातून, आमच्या घरादारातून, ज्यांनी आमची स्थिती पाहिली असेल त्यांना हे सांगावयास नकोच. आम्ही श्रीमंत आहो की गरीब, आमच्या पोटाला खायला मिळते की नाही याबद्दल एखाद्या इंग्रजाने आकडे मांडून आमची स्थिती भरभराटीची आहे, आमची प्राप्ती चांगली आहे; चांगली नसली तरी खर्चाच्या मानाने पुष्कळ आहे, असे म्हणणे म्हणजे मेलेला माणूस जिवंत आहे असे सांगण्यासारखे आहे. काही इंग्रज पत्रकार अजून असे लिहितात व आमच्यातील काही शहाणे लोक तसे मानतात, पण आम्हाला आमची स्थिती निकृष्ट आहे हे सिद्ध करून द्यावयास नको का? गरीब असलेले लोक कालांतराने श्रीमंत होतात व श्रीमंत असतात ते गरीब होतात. हा व्यक्तीसंबंधाचा अनुभव राष्ट्रासंबंधानेही येत असतो. हिंदुस्थानात एकदा सोन्याचा धूर निघत असे. आता गोवऱ्यांचा तरी निघतो की नाही याची शंका आहे. इकडे, इंग्रज पूर्वी एकदा गरीब होते, ते आता श्रीमंत झाले आहेत.'

धंदेशिक्षण कसे आवश्यक आहे ते लोकमान्यांनी अनेक सभांमधून स्पष्ट केले आहे. बार्शी येथे ३ मार्च १९०८ रोजी झालेल्या सभेत त्यांनी काय सांगितले ते पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, 'आज इतकी वर्षे हिंदुस्थानात राहूनसुद्धा एकाही साहेबास मराठी भाषेत तास दोन तास भाषण करता येत नाही; पण आमच्या ग्रॅज्युएटास इंग्रजी उत्तम बोलता आले पाहिजे अशी सक्ती आहे. इंग्रजी बोलता अगर लिहिता येणे म्हणजे सुशिक्षित होणे अशी शिक्षणाची व्याख्या झाली आहे. पण नुसते भाषाज्ञान हे खरे ज्ञान नव्हे. परकी भाषा इतक्या उत्तम रीतीने शिकावी लागण्याचा जुलूम दुसरीकडे कोठेही नाही. आम्हांस परकी भाषेतून ज्ञान संपादन करावे लागत असल्यामुळे सात-आठ वर्षांत मिळण्यासारख्या ज्ञानासाठी आम्हास वीस-पंचवीस वर्षे खर्चावी लागतात. इंग्रजी अजिबात न शिकून आमचे भागावयाचे नाही; पण ज्ञान मिळवण्यास साधन म्हणून त्या भाषेत प्रावीण्य मिळविण्याचे आम्हास बिलकुल कारण नाही. आज शंभर वर्षात आम्हाला आगकाडी कशी करावी हे समजलेले नाही; ह्यांस मोठी विद्वत्ता लागते अशातली गोष्ट नाही. सोलापुरात गवताच्या काड्या करतात, पण आमच्या देशात गवताची कमतरता नाही, म्हणून हा धंदा वाढविल्यास परदेशी काड्या पुष्कळ कमी येऊ लागतील. मॉरिशस येथील उसाइतका चांगला उस आमच्या देशात आहे. तेथील उसाइतकी साखर पुण्याच्या आसपासच्या शेतात असते, असे त्या उसाचे पृथक्करण करून पाहता दृष्टोत्पत्तीस आले आहे. साखरेच्या पायी सहा कोटी रुपये आपण परक्यांच्या पदरात टाकतो. असे का व्हावे? का येथे उस नाही की यंत्रे मिळत नाहीत? याचे कारण हे शिक्षण आम्हास मिळत नाही हे आहे.'

पुणे जिल्हा सभेच्या २१ मार्च १९०८ च्या बैठकीत बोलताना टिळक म्हणाले की, 'शिक्षणाचे दार बंद करणे आणि पुढला मार्ग संकुचित करून बुद्धीचा विकास होऊ न देणे हे हल्लीच्या शिक्षण पद्धतीतील दोष आहेत. सरकारला हे कळत नाही असे नाही. राणी सरकारच्या स्मारकाकरता जमलेले पैसे लोकांच्या शिक्षणाकडे खर्च करण्यास सरकार (इंग्रज) तयार झाले नाही. लॉर्ड कर्झन यांनी नवा ताजमहाल बांधण्याचे ठरविले, पण त्याप्रीत्यर्थ लागणारे कित्येक लाख रुपये औद्योगिक शिक्षणाकडे खर्च करण्यास सरकार तयार झाले नाही. सरकार स्वतः करत नाही व दुसऱ्याला स्वतंत्रपणे करू देत नाही, अशी स्थिती आहे. अमुक एक मर्यादेपर्यंत आम्ही जावे असे सरकारचे धोरण आहे. हिंदुस्थानने मँचेस्टरसारखी शहरे पोसावी, अशी त्यांची इच्छा आहे. राष्ट्राच्या गरजा किंवा इष्टसाध्य यासंबंधांच्या सरकारच्या व आमच्या कल्पना भिन्न असल्यामुळे त्यांच्या व आमच्या शिक्षणविषयक विचारात भेद होणे स्वाभाविक आहे.'

लोकमान्यांच्या विचारांचे आजच्या काळात किती महत्व आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यांनी धंदेशिक्षणास प्राधान्य दिले, पण त्याबरोबरच हे सर्व शिक्षण देशी भाषात दिले जावे यासाठी आग्रह धरला. आपल्यावर परकीयांचे राज्य आहे, म्हणून त्यांच्याकडून शाळांनी अनुदान घ्यायचे नाही असे नाही, कारण ते आमच्याकडूनच कररुपाने पैसा गोळा करणार आणि आमच्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी तो देणार, यात उपकाराची भावना अजिबात असता कामा नये. पण ते जर आमच्यावर हे शिकवा, ते शिकवू नका, असा आग्रह धरणार असतील तर त्यांचे अनुदान आम्हास कुचकामाचे आहे, असे ते म्हणत.

त्यांच्याकडे किती दूरदृष्टी होती ती त्यांच्या १० एप्रिल १९०० च्या केसरीमधील लेखावरूनही दिसून येते. तसे अनेक लेख आहेत की ज्यात त्यांच्या अशा दूरदृष्टीचे अनेक दाखले आपल्याला सापडतात. त्या लेखात ते म्हणतात, 'देशाच्या उन्नतीचे काम सरकारनेच हाती घेतले पाहिजे आणि सरकार जेव्हा ते हातात घेईल तेव्हाच हिंदुस्थानचे शेकडो विद्यार्थी दरवर्षी परदेशात जाऊन या देशाची लवकरच उन्नती होईल. नाहीपेक्षा दारिद्र्य, दुष्काळ आणि त्याच्या अनुषंगाने चालणारे साथीचे रोग, या त्रयींपासून आम्ही काही केले तरी आमची सुटका होणे दुरापास्त होय.' याच लेखात ते म्हणतात, 'हिंदुस्थानातील कोणते धंदे बुडाले आहेत अथवा पुन्हा ऊर्जितावस्थेत येण्यासारखे आहेत याची माहिती सरकारच्या दफ्तरी पूर्ण भरलेली आहे. पण या विषयाची थोडक्यात माहिती फिरोजशहा रुस्तमजी नरीमन यांनी नुकताच छोटेखानी १०८ पृष्ठांचा जो एक निबंध प्रसिद्ध केला आहे त्यात दिली आहे. या निबंधाची एक प्रत लेखकाने आमच्याकडे पाठविली आहे. निबंध उपयुक्त असून तो वाचल्याने 'आमचे धंदे नाहीसे झाले किंवा होत आहेत व त्यामुळे आपल्या देशात दारिद्र्य कसे येत आहे याची थोडक्यात कोणासही चांगली कल्पना येईल. आज किती बाबतीत आम्ही लंगडे पडलेलो आहो व कोणते धंदे सुधारल्याखेरीज आम्हांस गत्यंतर नाही याची हा निबंध वाचून कोणालाही सहज कल्पना येईल.'

'व्यापारी शिक्षणाची शाळा' या शीर्षकाने ५ जून १९०० रोजी लिहिलेल्या अग्रलेखात टिळक म्हणतात, 'नवीन धंदे शिकण्यास काही वर्षे वेळ लागेल, पण व्यापारापुरते इंग्रजीचे ज्ञान पुष्कळास असताही त्यांच्या ठिकाणी व्यापारासंबंधी इतर माहितीचे जे अज्ञान दिसून येते ते दूर करण्यास फार वेळ किंवा प्रयास पडणार नाही. देशी तऱ्हेचे व्यापारी हिशेब ठेवावे कसे हे आमच्याकडे पुष्कळास माहिती आहे; व आजपर्यंत मोठमोठ्या पेढ्यांवरचेच काय पण मराठी राज्याचेही हिशेब आमचेच लोक ठेवीत असत. अशा लोकांस इंग्रजी पद्धतीचे व्यापारी पेढ्यांचे किंवा आयुष्याचा विमा उतरविणाऱ्या कंपन्यांचे हिशेब अगर पत्रव्यवहार ठेवता येणार नाहीत असे नाही. तशा प्रकारचे शिक्षण मात्र त्यास मिळाले पाहिजे. हल्लीच्या शिक्षणक्रमात मात्र ते मिळत नाही; यामुळे व्यापारी लोक आपली मुले या शाळांतून धाडीत नाहीत. पण येथे जर व्यापारी शिक्षणाच्या शाळा निघतील तर केवळ व्यापारी लोकच आपली मुले या शाळेत पाठवतील इतकेच नव्हे तर इतर लोकही मोठ्या खुशीने आपल्या मुलांना शिक्षण देतील. आर्टस कॉलेजातील उदात्त शिक्षणाची किंमत फारच कमी झालेली आहे ही गोष्ट आता पुष्कळांच्या नजरेस येऊन चुकली आहे. पण दुसरी दिशा दाखवणारा कोणी नसल्यामुळे मेंढ्यांच्या कळपाप्रमाणे सर्व लोक दृष्टी असूनही आंधळ्यासारखे झाले आहेत. अशा लोकांस नवीन मार्ग दाखविणे हे लोकांच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे. या नवीन मार्गापैकीच व्यापारी शिक्षण हा एक मार्ग आहे.'

# लोकमान्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्व

औद्योगिक पारतंत्र्य हा अग्रलेख त्यांनी लिहिला (२५ सप्टेंबर १८९४). त्यात त्यांनी औद्योगिक पारतंत्र्य हे राजकीय पारतंत्र्याप्रमाणे देशाला संकटात नेऊन ठेवणारे असल्याची जाणीव लोकमान्यांना होती. औद्योगिक प्रगतीशिवाय देशाला आर्थिक स्थैर्य मिळू शकणार नाही, हे त्यांनी आपल्या अग्रलेखांमधून स्पष्ट केलेले होते. थोडक्या भांडवलात कोणते धंदे काढता येऊ शकतात, त्याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले होते. त्यांनी स्वतः तळेगाव येथे पैसा फंडातून उभारलेला काच कारखाना आणि अन्य दोन भागीदारांसमवेत त्यांनी लातूरसारख्या ठिकाणी उभारलेली जिनिंग फॅक्टरी ही त्यांची सहकाराविषयीची श्रद्धा होती. एका अर्थाने ते सहकार या तत्वाचेही जनक होते. कामगार वर्गाच्या भांडवलदारांकडून होणाऱ्या शोषणावरही त्यांनी १ मे १८८१ च्या मराठामध्ये टीका केली होती. व्यापारी शिक्षणाची महाविद्यालये अस्तित्वात नव्हती, तेव्हा त्यांनी ती निघाली पाहिजेत, असा आग्रह धरला होता. इसवी सन १९०० पर्यंत मुंबई विद्यापीठात तरी कॉमर्सचे शिक्षण सुरु झालेले नव्हते. कॉमर्सचे शिक्षण मुंबईच्या सिडेनहॅम कॉलेजमध्ये सुरु झाले ते १९१८ मध्ये. चेन्नईमध्ये (तेव्हाच्या मद्रासमध्ये) ते १८८६ मध्ये सुरु झाले. ते म्हणतात त्याप्रमाणे या शिक्षणक्रमास तेव्हा फक्त व्यापाऱ्यांचीच मुले जात असतील असे नाही. आता तर असंख्य विद्यार्थी त्याकडे चरितार्थाचे उत्तम साधन म्हणून पाहात असतात. व्यापारी शिक्षण हे असे मिळायला लागल्यावर विद्यार्थी संख्या वाढली आणि आता तर विज्ञान शाखेनंतर वाणिज्य म्हणजेच कॉमर्सचा क्रम या अभ्यासक्रमात लागतो आणि असा अभ्यासक्रम शिकवणारी अनेक महाविद्यालये महाराष्ट्रात स्थापन झाली आहेत. टिळकांनी या अभ्यासक्रमाचा तेव्हा आग्रह धरला होता. त्यापलीकडे त्यांनी देशात सर्वत्र औद्योगिक शिक्षणाच्या शाळा निघाव्यात हा आग्रह धरला होता. स्वदेशीचा आग्रह धरताना त्यांनी देशांतर्गत वस्तू देशातच तयार व्हाव्यात असे म्हटले होते. 'पुण्यातील पहिली चिमणी' हा अग्रलेख लिहितानाही त्यांनी आपल्या देशात तयार झालेले कापड परदेशात विकले जावे, असे सांगताना त्यासाठी लागणारे सूत आणि त्याची यंत्रसामग्री परदेशातून फार तर मागवावी, पण आपल्याकडे तयार झालेल्या मालास बाहेरच्या देशात उठाव कसा मिळेल ते पाहावे, असे म्हटले होते. आज आपले सरकार 'मेक इन इंडिया'चा आग्रह धरते आणि त्याप्रमाणे आपली धोरणे राबविते. तेच त्यांनी स्वदेशी आणि बहिष्कार या तत्वांचा अंगिकार करताना शंभर वर्षांपूर्वीच्या काळात सांगितले होते. त्याचबरोबर धंदेशिक्षणात व्यावसायिक शिक्षणालाही स्थान दिले आहे. त्यांनी बऱ्याच आधीपासून धंदेशिक्षणात 'इंडस्ट्रियल ट्रेनिंग'ला म्हणजे लोहारकाम, सुतारकाम, फिटर आणि अन्य तंत्रज्ञान यांच्या शिक्षणास अगक्रम दिला होता आणि नंतरच्या काळात हे अभ्यासक्रम सुरु झाले हे आपण जाणतोच. टिळक हे व्यवहारवादाची जपणूक करणारे राष्ट्रीय नेते कसे होते तेच आपल्याला त्यांच्या या सर्व प्रतिपादनावरून कळून येते. त्यांच्या मांडणीनुसार इंग्रजी अभ्यासक्रमात दोन अधिक दोन बरोबर चार असेच शिकवत असतील तर हिंदी (राष्ट्रीय) शिक्षणात दोन अधिक दोन मिळून पाच होत नाहीत, असेच सांगितले. तेव्हा इंग्रजी

शिक्षण उच्च दर्जाचे आणि हिंदी शिक्षण कनिष्ठ दर्जाचे असे सरसकट म्हणून चालणार नाही. टिळकांच्या द्रष्टेपणाची साक्ष या पलीकडे कोणती असू शकते?

## संदर्भ सूची

१) समग्र टिळक खंड १ ते ८

२) केसरीची त्रिमूर्ती : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

३) लोकमान्य टिळकांचे केसरीतील लेख

४) टिळकपर्व (१९१४-१९२०)

■ ■ ■



१४ एप्रिल १८९१ - ६ डिसेंबर १९५६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक शिक्षणाचे पथदर्शक

## संक्षिप्त परिचय

भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू येथे झाला. या गावचे नाव आता 'आंबेडकर नगर' आहे. आईचे नाव भिमाबाई सकपाळ व वडिलांचे नाव रामजी सकपाळ होते. वडील सुभेदार रामजी हे सुभेदार ते नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक पदापर्यंत पोहोचले होते. आंबेडकरांचे मूळ गाव महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातील आंबवडे होते. नोव्हेंबर १९०४ मध्ये भीमरावांनी इंग्रजी चौथीची परीक्षा उत्तीर्ण केली. मुंबईला सरकारी शाळेत पुढील शिक्षण झाले. १९०६ मध्ये भीमरावांचे लग्न रमाबाई यांच्याशी झाले. एल्फिंस्टन हायस्कूलमध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कृष्णाजी केळुस्कर गुरुजी यांच्या

अध्यक्षतेखाली मोठी जाहीर सभा भरवण्यात आली. तीत भीमरावांचा भव्य सत्कार करण्यात आला. दहावीनंतर केळुस्कर गुरुजींनी मुंबईमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्याशी भीमरावांची भेट घालून दिली. महाराजांनी त्यांना दरमहा २५ रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर केली. सन १९१२ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठाची राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विषयात पदवी संपादित केली. बडोदा नरेशांकडून दरमहा साडेअकरा पौंड शिष्यवृत्ती घेऊन अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर परदेशातून अर्थशास्त्रामध्ये डॉक्टरेट (पी.एचडी) पदवी मिळवणारे पहिले भारतीय होते. बाबासाहेब हे त्यांच्या हयातीतील भारतातील सर्वात प्रतिभाशाली, सर्वाधिक उच्च विद्याविभूषित होते. त्यांनी बीए, दोनदा एम. ए., पीएचडी, एम.एससी आणि डीएससी या पदव्या मिळवल्या. १९५० च्या दशकात त्यांनी एलएलटी आणि डिलीट या दोन उच्च पदव्या मिळविल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी अस्पृश्यता निर्मूलन व जातीअंताचा लढा दिला. काळाराम मंदिर प्रवेश, महाडचा सत्याग्रह, पुणे करार यामधून त्यांनी सामाजिक समतेसाठी समाजाला दिशा देणारे महत्त्वपूर्ण कार्य केले.

हिंदू धर्मातील जातीय भेद संपवून समान संधी व सर्वांना सन्मान दिला जावा यासाठी अथक प्रयत्न केले; परंतु अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे नागपूर येथे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी हजारो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यांनी महात्मा फुले, संत कबीर व तथागत गौतम बुद्ध यांना गुरु मानले होते. सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्काचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूर मंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार होते.

विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' व 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात. डॉ. आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदव्या मिळविल्या; तसेच त्यांनी कायदा, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांवर संशोधन केले. इ. स. १९९० मध्ये त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. इ.स. २०१२ मध्ये, "द ग्रेटेस्ट इंडियन" नावाच्या सर्वेक्षणात आंबेडकरांची 'सर्वश्रेष्ठ भारतीय' म्हणून निवड करण्यात आली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण झाले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्था

डॉ. आंबेडकर यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई या संस्थेची स्थापना ८ जुलै १९४५ रोजी केली. देशभर आणि मुख्यत्वे मागासलेल्या वर्गात उच्च शिक्षणाचा प्रसार करणे हे या संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट आहे. याच ध्येयानुसार मुंबईत १९४६ मध्ये सिद्धार्थ महाविद्यालय सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

म्हणतात, मला सांगायला आनंद वाटतो की, अवघ्या चार वर्षांच्या अवधीत विद्यार्थ्यांची संख्या, देशी-विदेशी खेळ आणि शैक्षणिक दर्जा या सर्वच बाबतींत सिद्धार्थ महाविद्यालयाने मुंबई राज्यात महत्त्वाचे स्थान पटकाविले आहे.

१९ जून १९५० रोजी मिलिंद महाविद्यालय सुरू केले. या महाविद्यालयाच्या इमारतीची कोनशिला भारताचे प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते १ सप्टेंबर १९५१ रोजी बसविण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना विद्या, विनय आणि शील बनविणे हेच मिलिंद महाविद्यालयाचे ध्येय आहे, असे सांगितले.

## आधुनिक शिक्षण विकासाचा मार्ग

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर खडतर ज्ञान साधना करून विधिशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांमध्ये प्रभुत्व संपादन केले. दलित, शोषित आणि पीडित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. ते पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी 'लोकशिक्षक' या नात्याने अनेक शैक्षणिक कार्य करून आपले शिक्षणविषयक विचार मांडले.

शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. वंचित समाजाला शिक्षणाचे महत्त्व अत्यंत सोप्या भाषेत आणि कळकळीने समजावून सांगताना बाबासाहेब म्हणतात, "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही."

तसेच "व्यक्तीला अस्तित्वाची, क्षमतांची आणि सामर्थ्याची जाणीव करून देते ते शिक्षण होय." केवळ बाराखड्या शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षणही शाळांनी दिले पाहिजे, इतका सूक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाबाबत केला आहे.

बाबासाहेब हे विद्वतेचे, ज्ञानाचे भोक्ते होते. त्यांनी असे सांगून ठेवले की, 'शिक्षक हा शालेय असो, महाविद्यालयीन असो की विद्यापीठीय असो त्याचे कर्तृत्त्व उत्तुंग आणि विद्यार्थ्यांना अनुकरणीय वाटले पाहिजे.'

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा उपयोग झाला पाहिजे, जो समाज अशिक्षित असतो तो शिक्षणाअभावी सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यावर आधारित समाज घडवण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करून दिली.

## जीवनाचा विकास म्हणजे तांत्रिक व कौशल्य शिक्षण

तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रशिक्षणाविना देशाच्या विकासाची कोणतीही योजना पूर्णत्वाला जाणार नाही. रोजगाराभिमुख शिक्षण हे भारतासाठी अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे तरुणांनी विविध कौशल्य संपादित करून वेगवेगळ्या क्षेत्रात देशाच्या प्रगतीला हातभार लावला पाहिजे. देशाच्या आर्थिक विकासासाठी व सामाजिक संतुलनासाठी तांत्रिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांने अधिक गतीने गेले पाहिजे. लोकसंख्या जशी वाढेल तशा समस्याही निर्माण होण्यास सुरुवात होतील. त्यामुळे आपल्याकडे असणाऱ्या कुशलतेचा उपयोग करून विविध प्रकारच्या कौशल्यांचा विकास केला पाहिजे. केवळ शेतीवर अवलंबून राहता कामा नये. जर दोन भाऊ असतील तर एका भावाने शेती केली पाहिजे व दुसऱ्याने नोकरी किंवा व्यवसायाकडे वळले पाहिजे. जर सर्व लोकसंख्येचा भार शेतीवर पडला तर शेतीतील छुपी बेरोजगारी वाढेल आणि त्यामुळे देशाला अनेक समस्येला तोंड द्यावे लागेल.

## तांत्रिक शिक्षण आणि वैज्ञानिक शिक्षणाचा आग्रह

देशाच्या विकासासाठी कोणतीही योजना तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रशिक्षणाची व्यवस्था असल्याशिवाय ती पूर्ण म्हणता येणार नाही. हे यंत्रयुग आहे आणि संघर्षाच्या या युद्धोत्तर युगात केवळ एखादा देश टिकू शकतो आणि आपल्या लोकांचे जीवनमान उंचावू शकतो. ज्यामध्ये तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रशिक्षण शिखरावर आहे. भारत सरकारही या परिस्थितीला अपवाद नाही आणि तांत्रिक प्रशिक्षण योजना केवळ अंमलात आणली जात नाही तर ती देशाच्या शिक्षण व्यवस्थेचा कायमस्वरूपी भाग बनते हे पाहणार आहे, हे विचार बाबासाहेबांचे होते. कामगार सचिव, भारत सरकार यांनी कलकत्ता येथे तांत्रिक प्रशिक्षण योजना सल्लागार समितीला संबोधित करताना त्यांनी ते मांडले होते.

नागरी उद्योगांच्या तांत्रिक प्रशिक्षण योजनांच्या गरजा विचारात घेण्यासाठी आणि समायोजित करण्यासाठी केंद्र सरकारने ही समिती स्थापन केली होती. त्यात अभियांत्रिकी संघटनांचे प्रतिनिधी आणि ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स, पुरवठा विभाग, रेल्वे बोर्ड आणि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचे प्रतिनिधी यांचा समावेश होता.

## उद्योगांनी प्रशिक्षण केंद्रे सुरु केली पाहिजेत

"प्रशिक्षित उद्योगांनी प्रशिक्षण केंद्र आपल्या बळावर उभी केली पाहिजेत व नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे हे सरकारचे उद्दिष्ट आहे, परंतु या प्रशिक्षित लोकांना रोजगार मिळण्याच्या शक्यतेवर योजनेचे यश अवलंबून आहे. प्रशिक्षण घेऊनही लोकांना रोजगार मिळत नसेल, तर तांत्रिक प्रशिक्षण योजना

अपयशी मानली पाहिजे. या प्रश्नाचे उत्तर या केंद्रांमधून प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या लोकांकडे उद्योगांचा दृष्टिकोन अवलंबून आहे. उद्योगांनी त्यांना रोजगार दिला नाही तर तांत्रिक प्रशिक्षणाची कोणी पर्वा करणार नाही आणि प्रशिक्षण केंद्रे बंद करावी लागतील. नागरी उद्योगांनी त्यांचा वापर करण्यात रस दाखवला तरच हा दुर्दैवी परिणाम टाळता येईल.

आज आकडेवारी पाहिली तर ६००० अतिरिक्त प्रशिक्षित, नागरी उद्योगांनी केवळ ३००० लोकांना नोकऱ्या दिल्या आहेत. खरेतर त्यांना अप्रशिक्षित लोकांना कामावर ठेवायचे आहे; कारण त्यांना हे समजते की ते नोकरीवर असताना किंवा शिकाऊ म्हणून कौशल्ये आणि प्रशिक्षण प्राप्त करतील. आमच्या प्रशिक्षण केंद्रांवर प्रशिक्षित लोकांना काम देण्यास उद्योगांच्या अनिच्छेची अनेक कारणे आहेत. आमचे प्रशिक्षण अपुरे असल्याच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत. नागरी उद्योगपतींचा भर आहे की त्यांच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता आमच्या केंद्रांमधून मिळणाऱ्या दर्जापेक्षा उच्च दर्जाची असावी. युद्धाच्या दडपणाखाली आमचे प्रशिक्षण झाले यात शंका नाही. युद्धापूर्वी ५ वर्षे प्रशिक्षण घेतले जायचे. तथापी, माझा असा विश्वास आहे की नागरी उद्योगांच्या गरजा लक्षात घेऊन, प्रशिक्षण कालावधी केवळ पाच वर्षांचाच असावा असे नाही. इतर देशांतील युद्धकाळातील अनुभवानुसार, सघन प्रशिक्षणामुळे बहुतांश उद्योगांमध्ये अर्ध-कुशल लोकांना त्वरीत प्रशिक्षित करता येते. प्रशिक्षण घेतल्यामुळे कार्याची व कामाची गुणवत्ता विकसित होईल. त्यामुळे देशातील पायाभूत विकास होण्यासाठी गती प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाही."

(कोलकाता येथे २४ ऑगस्ट १९४४ रोजी अभियंत्यांसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या भाषणाचा अंश)

## तांत्रिक प्रशिक्षण दर्जात्मक असले पाहिजे

शासनाच्या प्रशिक्षण योजनांमध्ये काही त्रुटी राहू शकतात. त्या मोकळेपणाने मान्य करून त्यात आवश्यक तो तर्कसंगत बदल करावा, तसेच अद्ययावत आणि विशिष्ट प्रशिक्षण हे उद्योगांकडूनही दिले जावे. उद्योगांचे हे दायित्व आहे. उद्योगांनी प्रशिक्षित लोकांना सामावून घेतल्याशिवाय तांत्रिक प्रशिक्षण सेवा यशस्वी होणार नाही. उद्योग आणि कामगारांचे सहकार्य हेच देशाला पुढे घेऊन जाईल, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, "आपल्यासमोर दोन प्रश्न विचारात घ्यायचे आहेत. पहिला प्रश्न ज्या प्रशिक्षित लोकांना युद्धानंतर सैन्यातून काढून टाकले जाईल त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि प्रशिक्षणाचा विहित कार्यक्रम पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध करून देणे. दूसरा प्रश्न, युद्धानंतर औद्योगिक पुनर्बांधणीच्या दृष्टीकोनातून तांत्रिक प्रशिक्षणाच्या योजनेत सुधारणा करणे.

या दोन वेगवेगळ्या प्रश्नांना वेगवेगळ्या प्रकारे सामोरे जावे लागते. त्यामुळे आम्ही दोन टप्प्यात काम करणे योग्य मानले आहे. दुस-या टप्प्यासाठी संबंधित प्रश्न असा आहे की, नागरी उद्योगांशी पूर्णपणे सुसंगत होण्यासाठी आम्ही आमच्या तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमात कोणते बदल केले पाहिजेत? त्यासाठी दीर्घकालीन धोरणाची गरज आहे, जेणेकरून युद्धानंतर देशातील उद्योगांच्या विकासासाठी तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देता येईल. त्यासाठी प्रशिक्षणात काळानुरूप आधुनिक व आवश्यक बदल केले पाहिजेत."

(कोलकाता येथील भाषणाचा अंश)

## शासन व उद्योगामध्ये समन्वयाची गरज

देशाचे भवितव्य उज्ज्वल करायचे असेल तर आपल्याकडे मोठ्या संख्येने कुशल कर्मचारी असणे आवश्यक आहे. शासन, उद्योगपती आणि कामगार यांच्या त्रिपक्षीय सहकार्यानेच तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी होण्याची अपेक्षा करता येईल. सरकारने सुरू केलेली तांत्रिक प्रशिक्षण योजना चालू ठेवण्यासाठी उद्योगपती आणि औदयोगिक कारखान्यांचे मालक यांच्या सहकार्याची गरज बाबासाहेबानी ओळखली होती.

लष्करात सेवा देवून निवृत्त होणाऱ्या जवानांबाबत बाबासाहेब म्हणाले, "जे प्रशिक्षित लोक लवकरच नागरी पदावर परततील त्यांच्या नशिबात बेरोजगारी लिहिली आहे का, त्यांनी जोखीम पत्करून केलेल्या सेवेचे हे फळ असेल का? मला आशा आहे की आम्ही त्यांना निराश करणार नाही. जर आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर ते उद्योगांमध्ये असंतोषाचे सक्रिय एजंट बनतील. जर ते नागरी क्षेत्रात योग्यरित्या आत्मसात केले गेले तर ते उद्योगांच्या स्थिरतेसाठी मदत करतील. त्यांनी लष्करात दाखविलेली शिस्त नागरी उद्योगांमध्येही तो दाखवेल. आता तुम्हीच सांगा नागरी उद्योगात त्यांना नवीन नोकरी देण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात? मी तुम्हाला खात्री देतो की तुमच्या सल्ल्याबद्दल सरकार तुमचे आभारी असेलच पण जो सल्ला तार्किक आणि व्यावहारिक वाटेल त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व उपाययोजना करेल."

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर - आधुनिक शैक्षणिक धोरणाचे पुरस्कर्ते

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक शिक्षणाचा सातत्याने आग्रह धरला. त्यांनी जगाबरोबर चालण्यासाठी आपल्याला जगातील भाषा शिकाव्या लागतील. जगातील विविध उद्योग व्यवसायामध्ये असणाऱ्या क्षेत्राचा अभ्यास करून भारतामध्ये विविध कारखाने उभे करण्यात त्यांनी उद्योग मंत्री असताना

महत्वाची भूमिका घेतली. त्यामुळे या देशातील उद्योगाचा पाया उभा करण्यामध्ये बाबासाहेबांचे मोठे योगदान आहे. या उद्योग व कारखान्यास लागणारा कुशल कामगार हा भारतातच निर्माण झाला पाहिजे, तरच उद्योगधंदे भरभराटीला येतील, असे त्यांचे मत होते. त्यामुळे इंजिनिअरिंग कॉलेज, आयटीआय कॉलेज व कौशल्य आधारित शिक्षणासाठी आग्रही भूमिका त्यांनी संसदेमध्येही मांडली.

तरुणांना कौशल्यावर आधारित आधुनिक शिक्षण दिले पाहिजे; कारण त्याच्या पोटाला भाकरी मिळाली तरच तो चांगले जीवन जगू शकेल. त्यामुळे प्रत्येक राज्यात तंत्रशिक्षणाच्या शाखा खोलाव्यात आणि उद्योगधंद्यासाठी आवश्यक ज्ञान त्यांना मिळावे. केवळ कामगार निर्माण करणे हे त्यांचे ध्येय नसून त्यांनी स्वतंत्र व्यवसाय उभे करावेत. एवढेच नाही तर मोठे कारखाने उभे करावेत आणि त्यासाठी शासनाने विशेष निधीची तरतूद केली पाहिजे. जगातील जे आधुनिक संशोधन होत आहे, आधुनिक तंत्रज्ञान विकसित होत आहे त्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी सुद्धा भारतीय तरुण सरकारच्या सहकार्याने प्रशिक्षित होऊन आला पाहिजे, जेणेकरून त्या ठिकाणच्या अत्याधुनिक कारखान्याची आपल्या देशात उभारणी करेल आणि भारतात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनी ज्या आधुनिक शिक्षणाची मुहूर्तमेढ उभी केली व पथदर्शी म्हणून योजना मांडल्या, त्यामुळेच आज भारत जगामध्ये सर्व प्रकारच्या तांत्रिक व कौशल्य शिक्षणामध्ये पुढे जाताना दिसत आहे. बाबासाहेब सतत सांगत की, शिक्षण हे केवळ डिग्री मिळवण्यासाठी नाही तर माणसाला आत्मसन्मानाने जगण्यासाठी रोजगारसुद्धा त्यातून मिळाला पाहिजे

## देशातील उद्योगधंदे हा देशाचा कणा

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रविषयक जे प्रमुख ग्रंथ लिहिले त्यामध्ये त्यांच्या 'Ancient Indian Commerce' या ग्रंथाचे महत्त्वाचे स्थान आहे. त्यात बाबासाहेबांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या १७९२ ते १८५८ या काळातील आर्थिक व्यवहाराबाबत अतिशय सखोल असे विवेचन केले आहे. या ग्रंथात भारताचे आर्थिक विषयाची उदासीनता व आधुनिक शिक्षणाचा अभाव, मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्याची उभारणी नसणे यामुळे भारताची लूट करण्यात इंग्रजांना यश आले, नाहीतर भारत हा जगातील विकसित राष्ट्रातील पहिल्या पंक्तीला उभा राहिला असता. यापुढे भारताला विविध क्षेत्रात संधी आहे. त्याचा उपयोग करून तरुणांनी पुढे गेले पाहिजे, असे मत त्यांनी मांडले आहे. त्यांच्या 'The Evolution of Provincial Finance in British India' या ग्रंथामध्ये त्यांनी १८३३ ते १९२१ या ब्रिटिशकालीन भारतात वित्तीय व्यवहारांमधील केंद्र आणि राज्य संबंधांचा ऊहापोह केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लंडन विद्यापीठाला सादर केलेल्या 'The Problem of the Rupee' या प्रबंधाचे पुढे जाऊन 'लंडन पी. एस. किंग सन' प्रकाशकाने 'The Problem of the Rupee' या नावाने १९२३ साली पुस्तक रूपात प्रकाशित केला आहे. सदर 'The Problem of the Rupee' या पुस्तकाची मांडणी जरी डॉ.

आंबेडकरांनी अर्थशास्त्राचा केवळ एक विद्यार्थी या नात्याने केलेली असली तरी भारताला जागे करण्याच काम या ग्रंथांनी केलेले आहे. हे ग्रंथ प्रत्येक भारतीयाला आर्थिकदृष्ट्या जागे करणारे व देशाला मार्गदर्शन करणारे आहेत. विशालहृदयी बाबासाहेबांनी भारताच्या खऱ्या समस्येला ओळखले व त्यावर या ग्रंथांमध्ये उपाययोजना सांगितल्या. उद्योगधंद्याची मोठ्या प्रमाणात उभारणी केली तर निर्यात मोठ्या प्रमाणात होईल आणि भारताचा जो आर्थिक समतोल आहे तो व्यवस्थित राहील. भारतामधून कुशाग्र बुद्धीचे लोक बाहेरील देशातील आधुनिक तंत्रज्ञानाला पुढे घेऊन जाण्यासाठी जात आहेत; पण त्यांनी प्रथम भारतातील तंत्र प्रशिक्षणाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सरकारनेही त्यांना आवश्यक मदत केली पाहिजे. यामुळे देशासमोरील अनेक प्रश्न सुटतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शिक्षण स्वावलंबी व आत्मनिर्भर बनवणारे असावे

विद्यार्थी वर्गाने जग कोणत्या दिशेने चाललंय याची जाणीव ठेवून त्या क्षेत्रामध्ये गेले पाहिजे. बाबासाहेब ज्यावेळेस विदेशामध्ये शिक्षणासाठी गेले होते त्यावेळी त्यांना अनेक विद्यार्थी हे स्वतःच्या पायावर उभे राहून आपले शिक्षण पूर्ण करताना दिसले. उद्योग क्षेत्रांमध्ये विविध प्रकारचे बदल व संशोधन होत असताना त्याचे ज्ञान मिळवणे ही काळाची गरज आहे. आजचा तरुण केवळ परंपरागत शिक्षणाकडे न जाता जगात चाललेल्या विविध शैक्षणिक बदलाचा पाठलाग केला पाहिजे तरच तो येणाऱ्या युगात आपले जीवन सुखकर करेल आणि आत्मसन्मानाने जीवन जगेल. कौशल्यपूर्ण तंत्रशिक्षणाचा उपयोग भारतासाठी अतिशय अमुलाग्र बदल घेऊन येणार आहे आणि ते शिक्षण प्रत्येक कुटुंबाला स्थिरता देणारे व आर्थिक स्वावलंबी बनवणारे आहे, अशी त्यांची भूमिका त्यांनी व्यक्त केली होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कौशल्यविषयक विचारांचे आजच्या काळातील महत्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व सामाजिक समस्यांचे उत्तर उच्च शिक्षण व कौशल्य शिक्षण असल्याचे म्हटले आहे. तसेच खरे शिक्षण राष्ट्रहित व समाजहिताचे भान ठेवणारे असते. त्यामुळे शिक्षणातून उत्तम, सुसंस्कृत व गुणवत्तामय ज्ञान प्राप्त करणारा व सामाजिक बांधिलकीने कर्तव्य जपणारा, समाजाला समर्थपणे पुढे घेऊन जाणारा, उत्तम कर्तव्यदक्ष नागरिक बनवणाऱ्या शिक्षणाला आपण अधिक महत्त्व दिले पाहिजे. आजच्या आधुनिक युगात बाबासाहेबांचे विचार सर्व समाजाला उत्तम प्रकारे विकासाकडे घेऊन जाणारे आहेत.

तांत्रिक व वैज्ञानिक प्रशिक्षणाशिवाय देशाच्या विकासाची कोणतीही योजना पूर्णत्वाला जाणार नाही, हा विषय बाबासाहेबांनी अतिशय परखडपणे मांडला. जगातील आधुनिकतेचा व प्रगतीचा प्रत्यक्ष अनुभव

त्यांनी घेतला. आपल्या देशातील तरुणांनी विविध प्रकारचे कौशल्य संपादित केले पाहिजे आणि त्यातून आर्थिक सक्षमता प्राप्त केली पाहिजे. आर्थिक सक्षम व्यक्ती सामाजिकदृष्ट्या सन्मानास प्राप्त होतो. त्यामुळे आधुनिक स्पर्धेच्या युगामध्ये बाबासाहेबांनी तांत्रिक व कौशल्य शिक्षणाला अधिक महत्त्व दिले होते.

पुस्तकी शिक्षण घेऊन 'प्रॅक्टिकली नॉलेज' नसणारा व्यक्ती कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकत नाही. ते म्हणत, तुम्ही सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा, पृथ्वीप्रमाणे पर प्रकाशित होऊ नका. म्हणजेच तुम्ही आत्मनिर्भर व्हावे.

कौशल्यपूर्ण व्यक्ती हा आपले जीवन आर्थिकदृष्ट्या स्थिर करून सामाजिक समतेस प्राप्त करतो, तसेच समाजासाठीही योगदान देऊ शकतो. त्यामुळे बाबासाहेबांनी आधुनिक शिक्षणामध्ये कौशल्य शिक्षणाला जे महत्त्व दिले. ते खऱ्या अर्थाने दूरदृष्टी व समाजातील सर्वांना मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे. तरुणांनी केवळ नोकरीत गुंतण्यापेक्षा विविध प्रकारचे अत्याधुनिक कारखान्याची उभारणी केली पाहिजे, या बाबासाहेबांच्या विचाराला आज अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. तरुणांनी छोटे-मोठे कारखाने उभे केले पाहिजेत, हा बाबासाहेबांनी दिलेला मंत्र सर्वात महत्त्वाचा वाटतो.

शिक्षणाने माणूस सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्टिकोनातून सक्षम स्वावलंबी राहण्यासाठी आणि त्याच्या वैयक्तिक गरजा परिपूर्तीसाठी कौशल्य आधारित ज्ञान संपादित करून त्या ज्ञानावर आधारित आपले जीवन परिपूर्ण व सुखकारक करून आपल्या राष्ट्राला विश्वाच्या पटलावर पुढे घेऊन जाण्यासाठी व सामर्थ्यशाली राष्ट्रनिर्माणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेला आधुनिक कौशल्य आधारित शिक्षणाचा विचार आजच्या तरुणांना व संपूर्ण भारताला मार्गदर्शक, पथदर्शक व प्रेरणा देणारा आहे.

## संदर्भ १:


१. द प्रॉब्लम ऑफ द रूपी (१९२३)

२. दि इव्हॉलुशन ऑफ द प्रॉव्हिन्शल फाइनॅन्स इन ब्रिटिश इंडिया (१९२४)

३. स्टेट्स अँड माइनॉरिटीज (१९४७)

४. हिस्ट्री ऑफ इंडियन करंसी अँड बँकिंग (१९४७)

५. फ्युचर ऑफ पार्लियामेन्ट्री डेमोक्रेसी (१९५१)

६. लिंग्विस्टिक स्टेट्स नीड्स फार चेक्स अँड बॅलेन्सेज(१९५३)

७. हिंदू वुमनः राइजिंग अँड फॉल

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण वाड्ःमय.

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध वर्तमान पत्रिका.

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १ ते २० भाषण खंड.

## संदर्भ २:

1) Dr. Babasaheb Ambedkar Written by Dhananjay Kir 1981 3rd Edition

2) Lokrajya – Oct 2006

3) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 18 Part 1 – Education Dept. Maharashtra (2002)

4) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 18 Part 2 – Education Dept. Maharashtra (2002)

5) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol. 18 Part 3 – Education Dept. Maharashtra (2002)

6) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol.-19 – Education Dept. Maharashtra (2005)

7) Dr. Babasaheb Ambedkar Writings and speeches Vol.-20 – Education Dept. Maharashtra (2005)

8) Dr. Babasaheb Ambedkar – Vasant Moon – Translated by Asha Damle – National Book Trust, India New Delhi – Reprinted – 2004, 2007

9) The constitution of India (up to and including the 94th Amendment) (as modified up to 12th June 2006) – Sixth Edition -2007 Government of India.

■ ■ ■



२८ मे १८८३ - २६ फेब्रुवारी १९६६

# यंत्रशक्तीचे कृतिशील पुरस्कर्ते – स्वातंत्र्यवीर !

## संक्षिप्त परिचय

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील क्रांतिपर्वाचे उद्‌गाते अशी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची ओळख आहे. मवाळ आणि जहाल असे दोन वर्ग भारतीय राजकारणात असताना सावरकरांनी महाराष्ट्रात नवा क्रांतिकारी वर्ग तयार केला. हळूहळू संपूर्ण भारतात हा नवा क्रांतिवर्ग सक्रीय झाला. पुढे अमेरिका, युरोपसह अनेक देशांतून सावरकरांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या बऱ्याच लहानमोठ्या क्रांतिकारकांच्या संघटना सक्रिय होत्या. राष्ट्रभक्त समूह किंवा मित्रमेळा या नावाने नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावातून सावरकरांनी या व्रताचा आरंभ केला.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर गावी २८ मे १८८३ रोजी झाला. इथेच त्यांचे प्राथमिक शिक्षणही झाले. पुढे पुण्यात शिक्षण करता करता त्यांनी आपल्या संघटनेचा विस्तार केला. अभिनव भारत असे नामकरण करून भारतातील पहिली विलायती कापडांची

होळी घडवून आणली.

१८५६ चे स्वातंत्र्यसमर, शिखांचा इतिहास, जोसेफ मॅझिनी यांचे आत्मवृत्त अशा ग्रंथांचे लेखन त्यांनी केले. लंडनला राहून ते ब्रिटीशविरोधी वातावरण निर्माण करत होते. खटला चालवण्यासाठी त्यांना भारतात नेण्यात येत असतांना वाटेत त्यांनी मोरिया या जहाजातून समुद्रात उडी मारली, आणि सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या त्यांच्या सततच्या या उलाढालींमुळे त्यांना ५० वर्षांच्या दोन जन्मठेपांची शिक्षा सुनावण्यात आली. अंदमाननंतर त्यांना रत्नागिरी येथे स्थानबद्ध करून ठेवले असता त्यांनी हिंदू धर्मातील जातिभेद बाजूला सारून सशक्त हिंदू समाज निर्माण व्हावा यासाठी मोठी सामाजिक चळवळ उभारली. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळवून दिला.

आयुष्याच्या उत्तरार्धात सावरकर हिंदू महासभेच्या माध्यमातून सक्रीय राजकारणात उतरले व नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सावरकरांनी जपानला जाऊन संघटन उभारण्याची सूचना दिली. फाळणी टाळण्यासाठी सावरकरांनी बराच प्रयत्न केला.

आपल्या उत्तर आयुष्यात त्यांनी सामाजिक विषयांवर नाटके लिहिली. भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले. बालपणापासून त्यांनी आशयसंपन्न कविता लिहिल्या. महाकाव्य लिहिण्याचा प्रयत्न केला.

देशाच्या सीमा सुरक्षित असाव्यात यासाठी सावरकर विशेष प्रयत्नशील राहिले. परराष्ट्र नीती आणि लष्करी सामर्थ्य याबद्दलचे त्यांचे विचार आजही देशाच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरले आहेत. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी दादर येथील घरी त्यांची प्राणज्योत मालवली.

साधारण १९६६ सालच्या फेब्रुवारी महिन्यापासून सावरकरांनी प्रायोपवेशन सुरु केले, म्हणजे

अन्न-पाण्याचा त्याग केला. २६ फेब्रुवारीला त्यांची प्राणज्योत मालवली. सावरकरांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले गेले ते विद्युतदाहिनीत ! विनायक दामोदर सावरकर हे तेव्हाचे एकमेव राजकीय नेते असावेत ज्यांच्यावर अशा प्रकारे कुठलेही धार्मिक संस्कार न करता आधुनिक पद्धतीने, यंत्राच्या सहायाने अंत्यसंस्कार झाले. सावरकरांनी तसे लिहूनच ठेवले होते, "मी मेल्यावर माझे शरीर विद्युत दाहिनीत झोकून द्या !"

यंत्रशक्तीचा इतका कठोर पुरस्कार करणारा, आधुनिक यंत्रे माणसाचे जीवन आणि मरण दोन्ही सुखकर करतील याची जाणीव असलेला असा हा स्वातंत्र्यवीर आणि यंत्रवीर नेता !

सावरकरांच्या बालपणाचा तो काळ मोठ्या धामधुमीचा होता. राजकीय पटलावर लोकमान्य टिळक भारताचे नेते होऊ पाहत होते, चापेकरांसारखी तरुण मुलं ब्रिटीश या देशातून निघून जावेत यासाठी जीवावर उदार झाली होती. या सगळ्याचा परिणाम लहानग्या विनायकाच्या मनावर झाला आणि तोही शपथबद्ध झाला, लढू लागला स्वातंत्र्यासाठी, तेव्हा त्याचं वय होतं अवघं १४ वर्ष ! त्याच्या मुळ

गावी भगूरला मित्रमेळा ही संस्था स्थापून त्यांनी सक्रिय क्रांतिकार्य सुरू केले. तरुण मुलं स्वातंत्र्याच्या भावनेने भारून टाकली. 'मित्रमेळा' आणि 'अभिनव भारत' ही या संस्थेची सुधारित रूपे. नाशिकच्या तिळभांडेश्वर मंदिराच्या बोळात तरुण मुले जमून क्रांतीयुद्धाच्या योजना आखू लागली. पुढे सावरकरांच्या नेतृत्वात पुण्यात याच संघटनेच्या सदस्यांनी भारतातील पहिली विलायती कापडांची होळी घडवून आणली. शस्त्रास्त्रे मिळवीत, आणि देशभर क्रांतीचा वणवा पेटावा म्हणून सावरकर लंडनला निघाले. तिकडून इथे भारतात बॉम्ब बनवण्याच्या पुस्तिका आणि तब्बल २१ पिस्तुले त्यांनी पाठवली. या बॉम्बच्या पुस्तिकेवरून बंगालचे क्रांतिकारक पेटले आणि त्यांनी मुजफ्फरपूर येथे किंग्जफोर्ड या अधिकार्याच्या बग्गीवर बॉम्ब टाकला. १७ वर्षांचा कोवळा मुलगा अनंत कान्हेरे याने पिस्तुल हाती धरले आणि विजयानंद नाट्यगृहात जाक्सनला कंठस्नान घातले. ज्या पिस्तुलाने हा वध झाला ते पिस्तुल सावरकरांनी लंडनहून पाठवलेले होते. लंडनला शिकणारा सुखवस्तू घरातला मदनलाल धिंग्रा हाही सावरकरांच्या शब्दांनी भारावला, इंडिया हाउस या लंडनमधील वास्तूवर आणि क्रांतिकारकांच्या हालचालींवर गुप्तपणे नजर ठेवणाऱ्या कर्झन वायलीला ठार केले. हे करतांना त्याने सावरकरांचा सल्ला घेतला होता. या काळात सावरकरांनी मॅझिनीचे आत्मचरित्र, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, शिखांचा इतिहास अशी पुस्तके लिहिली, देशाचा संकल्पित ध्वज तयार केला आणि लंडन पर्व गाजवले, तिकडून भारतात परततांना तर ब्रिटीशांच्या तावडीतून निसटण्यासाठी सावरकरांनी मार्सेे येथे जहाजातून समुद्रात उडी मारली, या सगळ्याची ब्रिटिशांना धास्ती बसली आणि त्यांनी सावरकरांना ठोठावल्या दोन जन्मठेपा. अंदमानात काथ्या, कोलू आणि कमालीचे श्रम सावरकरांच्या वाट्याला आले. शिळे, किडे असलेले बुरसट अन्न, खारे पाणी, जोडीला कठोर शिक्षा, एकांतवास हे सगळे सहन करूनही हा माणूस अंधारकोठडीत कविता लिहायचा, स्वतःला आणि इतरांना प्रेरणा द्यायचा. अंदमानच्या ११ वर्षांनंतर सावरकर अलीपूर आणि रत्नागिरी अशा कारागृहात एकूण तीन वर्ष राहिले आणि मग त्यानंतर जवळपास १३ वर्ष त्यांना रत्नागिरी येथे स्थानबद्ध केले होते इंग्रजांनी. या स्थानबद्धतेच्या काळात सावरकरांनी समाजातील अस्पृश्य, दलित वर्गात क्रांती घडवून आणली. शिवाशिव, रोटीबंदी, अशा विक्राळ सामाजिक प्रश्नाकडे लक्ष देऊन त्यांनी सर्वजातीय लोकांसाठी विठ्ठल मंदिर बांधले, पतितपावन मंदिर निर्माण करवून घेतले. सहभोजनाच्या पंगती उठवल्या, अखिल हिंदू उपहारगृह सुरु केले. अस्पृश्य आणि सवर्णांची मुले एका शाळेत शिकू लागली, आणि मुख्य म्हणजे रत्नागिरीतील पाचशेहून अधिक विहिरी अस्पृश्यांना खुल्या करवून दिल्या, खर्या अर्थाने त्यांच्या जीवनात बदल घडले.

२७ वर्षांच्या या अखंड शिक्षेनंतर सावरकर राजकारणात उतरले आणि देशाच्या संपन्नतेसाठी त्यांनी अनेक सकारात्मक सल्ले दिले. येत्या काळात जगाच्या नकाशावर सबळ, स्वयंपूर्ण आणि संपन्न राष्ट्र म्हणून उभे राहायचे असेल तर त्यासाठी आपण यांत्रिक प्रगती करायला हवी असा त्यांचा मोलाचा सल्ला. यंत्रयुग आणि यांत्रिक संपन्नता याबद्दलचे सावरकरांचे विचार आजही पथदर्शी आहेत. तेंव्हाच्या पिढीला केलेले मार्गदर्शन आजही आपल्याला नवे काहीतरी सांगते. सावरकर ज्यांना हे सांगत होते त्यांना वाटत

होते की, यंत्रयुग आले तर बेकारी वाढेल. नोकऱ्या जातील, ही धास्ती त्या काळात अनेकांना होती. तेव्हाचा समाज बराचसा पोथीनिष्ठ होता, तंत्रयुगाचा फारसा प्रचार झाला नसल्याने लोक संभ्रमात होते. अशा समाजाला सावरकर समजावून सांगत होते, यंत्रयुगाचा महिमा...! ते म्हणतात, "यंत्राचे साधन मनुष्याच्या हाती आल्यामुळे मनुष्याची हानीच होत आहे, तो दुबळा बनत आहे, दु:खी बनत आहे, दरिद्री बनत आहे, यंत्र हा मनुष्यजातीला लागलेला शाप होय अशी जे यंत्राविरुद्ध ओरड करतात त्यांनी हे लक्षात ठेवावे की यंत्र, हत्यार, कळ म्हणजे शतपटीने अधिक कार्यक्षम झालेल्या मनुष्याचे एकेक इंद्रिय आहे. कळ म्हणजेच इंद्रियाची वाढलेली कार्यक्षमता. हत्यार म्हणजेच हाताहूनही दसहत्यारी असा आपला एक जोड्हात. यंत्र म्हणजे आपल्या मूळच्या शक्तीपेक्षा लक्ष पटीने शक्तिमान झालेले आपले बहिश्चर इंद्रिये. जर हत्यार, कळ, यंत्र नसते तर मनुष्यसृष्टीवर आज चालवत असलेली सत्ता चालवू शकला असता का ?.... इतर धुरात आणि यंत्राच्या धुरात हाच फरक. इतर धुरांनी डोळे धुरकटतात, बिघडतात; पण यंत्राच्या धुराने मिटलेले डोळे उघडतात. चिपलेले निवळतात. सृष्टीला यथावत निरीक्षु शकतात, प्रत्येक यंत्र अज्ञान युगाचा एकेक दिवस संपवून विज्ञान युगाचा एकेक दिवस जवळ आणते. यंत्राने बेकारी वाढत नाही, विषम वाटणी वाढते, त्याला यंत्र नव्हे तर समाजरचना जबाबदार आहे." आज २१ व्या शतकात आपण आपण समाज रचना आणि सामाजिक धारणांच्या बाबतीत बरेच पुढारलेले आहोत त्यामुळे तो धोका फारसा राहिला नाही. सावरकर सांगतात, "पूर्वी मिळत होते त्यापेक्षा दसपट अधिक अन्नवस्त्र, त्याहीपेक्षा कमी काबाडकष्टात जर उत्पादिले जात असेल तर यंत्राने त्यातील प्रत्येक व्यक्तीस पूर्वीपेक्षा दसपटीने अधिक सुखी केले असेच म्हंटले पाहिजे."

यांत्रिक संपन्नता किंवा यांत्रिक कौशल्य तरुणांनी शिकावे हे सावरकर पटवून देतांना काय सांगतात पहा, तरुणाई जर यांत्रिक संपन्न झाली तर त्यांना फायदा आहेच पण त्याचा फायदा राष्ट्राच्या अभिवृद्धिलाही आहे हे पटवतांना सावरकर म्हणतात, "घरच्या एका कुटुंबाप्रमाणेच एका राष्ट्राची स्थिती त्या राष्ट्रात यंत्रहीन स्थितीत त्यातील सर्व लोकांना अन्न, वस्त्र, घरदार, गाड्या, सूरे, शस्त्रे, प्रभृति संसाराच्या अनेक वस्तूंसाठी दिवसा दहा तास खपावे लागे असे समजू. आता त्या त्या वस्तूंना करणारी यंत्रे आणली, तेथील शेती, गिरण्या, कारखाने, नव्या विज्ञान पद्धतीने यांत्रिक प्रमाणावर चालू झाले, तर त्याचे उत्पन्नही यांत्रिक प्रमाणावर वाढणार."

सावरकरांच्या म्हणण्याप्रमाणे यंत्राने आर्थिक स्त्रोत वाढणार, श्रम कमी लागणार हे खरे आहेच, पण तंत्रशिक्षण आणि यांत्रिक गुण आत्मसात केल्यामुळे माणसाच्या जीवनशैलीवर किती सकारात्मक परिमाण घडून येतील हे सावरकर पुढे सांगतात, "अन्नवस्त्र, बूट, छत्रीप्रभृती त्या त्या सार्या वस्तू पूर्वीपेक्षा दसपटीने अधिक प्रमाणात, दसपटीने कमी व्यापात नि श्रमात म्हणूनच दसपटीने स्वस्तात मिळू लागतील. त्यांच्या आवश्यकता अशा प्रकारे भागू लागल्याने पूर्वीचे काबाडकष्टही दशांशाने कमी होतील. त्यामुळे उरलेला वेळ आपापल्या हौसेच्या कामात तरी जो तो स्वेच्छेने घालवील. किंवा विसाव्यात घालवील.....मनुष्य जे काबाडकष्ट करत असतो ते त्यास हवेच म्हणून करीत नसतो, यंत्राने काबाडकष्टांची आवश्यकता

जितकी कमी होईल तितकेच मनुष्यास हलके वाटेल, बरेच वाटेल...पूर्वीपेक्षा रिकाम्या राहणाऱ्या या वेळात सर्वांनाच अधिक सुट्या आणि कमी श्रम भोगू द्या. काबाडकष्टावाचून वाचलेला आणि सक्तीचे काम नसलेला वेळ ज्याला त्याला आपापल्या लहरीप्रमाणे काव्य, कला, व्यायाम, वाचन, परोपकार, इतर उद्योग संशोधन, करमणूक, कसरती, यथा इष्ट तथा घालवू द्या. " आपल्या जीवनशैलीचा स्तर अधिकाधिक उंचावण्यासाठीसुद्धा तंत्रशिक्षण उपयोगी पडणार आहे, त्यामुळे आपण यंत्रयुगाचे स्वागत करायला हवे, यंत्राभिमुख व्हायला हवे, हा सावरकरांच्या म्हणण्याचा सारांश !

सध्याच्या काळात आपला देश अधिकाधिक यंत्रशील आणि तंत्रशील व्हावा यासाठी शासनाच्या दृष्टीने वेगवान प्रयत्न सुरु आहेत. यंत्रांवर आधारित व्यवसाय वाढले तर राष्ट्राचे दरडोई उत्पन्न वाढते, परिणामी जागतिक चढाओढीच्या स्पर्धेत देश एक पाउल पुढे टाकतो. चांद्रयान मोहिमा, तेलनिर्मिती साठी समुद्रतळाचे खोदकाम, अणुउर्जा किंवा सौरऊर्जा यांसारख्या आधुनिक तंत्रांच्या वापरासाठी यंत्रशक्ती आपल्या मदतीला धावून येते, यंत्रांच्या मदतीने अशी अनेक शिखरे पादाक्रांत करण्यात सुलभता येते हे सिध्द झाले आहे. युरोपीय राष्ट्र यंत्रशक्तीमुळे प्रगती करू शकली हे सावरकरांनी तेंव्हाच ओळखले होते. त्याच धर्तीवर आपला देश घडवताना सावरकरांना शासकीय पातळीवरून आणि लोकांकडून काही बदल अपेक्षित आहेत. ते म्हणतात, "आम्ही सर्वजण यंत्रयुगाचे स्वागत करतो. कारण हे यंत्रयुग आहे. हस्तव्यवसायांना देखील एक स्थान आहे आणि ते उत्तेजनार्हही आहे. परंतु राष्ट्रीय उत्पादन हे शक्य तितक्या अधिकतम विस्तृत यांत्रिक प्रमाणावरच चालेल." शेतीसारख्या बाबतीत त्यांचे विचार बरेच पुढारलेले आहेत. सावरकरांच्या मते, "मोठ्या यंत्रांच्या सह्हायाने, मोठ्या प्रमाणावर आणि शास्त्रीय पद्धतीने राज्याकडूनही शेती नि जमीन काढून घेऊन काही अंशी कसण्यात येईल. यात हेतू हा राहील की, यांचा उपयोग शेतकऱ्यांना शेतीचे शिक्षण देण्याकडे व्हावा."

रशियासारख्या देशाबद्दल लिहितांना सावरकर म्हणाले होते, "यंत्रशक्तीमुळेच रशिया हे आज जगातील प्रबळ, संपन्नातले संपन्न, प्रत्येक जणांना काम, अन्न, वस्त्र, आणि आनंद समतेने उपभोगू देणारे राष्ट्र झाले आहे !"

यंत्रविद्येमुळे आपण हवी तशी प्रगती करू शकलो हे मान्यच, पण यंत्र हाताळण्यासाठी कुशल मनुष्यबळ हवे. एखादा उद्योग हा एखाद्या समूहासारखा असतो. सामुहिक शक्तीतून उत्पादन उभे राहत असते. यासाठी मनुष्यबळाचा योग्य ठिकाणी अचूक वापर आवश्यक असतो. माणसांच्या नेमणुकीत जराशी चूक बराचसा समतोल बिघडवू शकते. अशा वेळी आपल्या समूहाला बांधून ठेवणे, त्यांच्याकडून अधिकाधिक उत्पादन तयार करून घेणे हे करून घेणे हे कुशल नेत्याच्या हाती असते. हल्लीच्या काळात मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना याचे प्रशिक्षण दिले जाते. सावरकरांनी एक कुशल संघटन कसे असावे, टीम लीडरने आपल्या सहकार्यांकडून कामे कशी करून घ्यावीत याचा आदर्श वस्तुपाठ आपल्यापुढे घालून दिला आहे.

अभिनव भारत ही त्यांची गुप्त क्रांतिकारी संघटना. आपला देश स्वतंत्र व्हायला हवा आणि त्यासाठी आपण तरुणांनी सामुहिक प्रयत्न करायला हवेत हे सावरकरांनी पटवून दिले, मुले एकत्रित केली. स्वातंत्र्य मिळवायचे आहे, चला...अशा विनायकाच्या सादेला प्रतिसाद देत ही तरुण पोरं पुढे आली. पण यांच्या कुणाच्याही घरात राष्ट्रभक्तीच्या परंपरा नव्हत्या, स्वातंत्र्यासाठी काय करायला लागते याचे भानही त्यांना नव्हते. आजच्या भाषेत सांगायचे तर मनुष्यबळ होते पण अकुशल, अशिक्षित. अशांना गुप्तपणे क्रांतीकार्य कसे करायचे. त्यासाठी काय खबरदारी घ्यावी लागेल, याबद्दल सावरकरांनी प्रशिक्षित केले, आणि आपली संघटना वाढवली. पुढे या मुलांच्या घरादारावर आपत्ती आली, तरीही संघटनेच्या गुप्त बातम्या त्यांच्या तोंडून सरकारला समजल्या नाहीत. उद्योग किंवा व्यवसायात सुद्धा आपली बलस्थाने किंवा काही गुपिते आपल्या प्रतिस्पर्धी व्यावसायीकाला समजली तर धोका संभवतो. अशावेळी आपला कामगार वर्ग हा कुशल असावा लागतो, तरच टीम म्हणून, युनिट म्हणून उद्योग दिमाखात उभा राहू शकतो.

तेंव्हाच्या काळात इंग्रजी राज्याविरोधात लढण्यासाठी सावरकरांना हवी होती शस्त्रास्त्रे. शस्त्रास्त्रे वैगेरे जाहीरपणे मिळवता येत नसत असा तो काळ. मिळाली तरी ती चालवण्याचे प्रशिक्षण नसे. अशावेळी आपल्या संघटनेच्या सभासदांना सावरकरांनी शस्त्रे चालवायला शिकवले. कौशल्य अंगी नसलेले लोक उद्योगात कामाचे नसतात, असतीलच असे तर त्यांना प्रशिक्षित करावे लागते, तरच उद्योग उभं राहू शकतो, सावरकरांचा हा वस्तुपाठ आहे.


मल्टीटास्किंग कसे करावे याचा आदर्श सावरकरांनी लंडन पर्वात घालून दिलाय. एकाच वेळी ते १५ ते वीस आघाड्यांवर यशस्वी काम करत होते. लंडनला बॅरिस्टर होण्याचे शिक्षण घेता घेता, माझिनी चरित्रलेखन, १८५७ च्या स्वातंत्र्यसमरचे लेखन, बॉम्ब पुस्तिका, पिस्तुले भारतात पाठवणे, तरुणांना प्रेरित करणे, अशा विविध आघाड्यांवर हा मुलगा एकटा काम करत होता. एकाच वेळी अनेक पातळ्यांवर काम करता येणे याला हल्ली मल्टीटास्किंग म्हणतात, याचे क्लासेस घेतले जातात आजकाल. एकाच वेळी अनेक कामे करणाऱ्या बहुआयामी माणसांची प्रत्येक उद्योजकाला गरज असतेच.  व्यवसायात, आणि तंत्रशिक्षणात याचे महत्व अनन्यसाधारण आहे.

दादरला शिवाजी पार्काजवळच्या आपल्या निवासस्थानी उत्तरायुष्यात त्यांना काही तरुण सल्ले मागायला येत. अशा तरुणांना नोकऱ्या करण्याऐवजी स्वतःचे उद्योग उभारा, असा सल्ला सावरकर देत.  त्या क्षेत्राचे ज्ञान जर तुम्हाला नसेल तर शास्त्रशुद्ध शिक्षण घ्या, ते शिक्षण घेतांना मात्र मातृभाषेचा आग्रह धरा असेही सावरकर सांगत. परकीय भाषेतील शिक्षणापेक्षा मातृभाषेतून जेंव्हा व्यक्ती शिकतो तेंव्हा त्याच्या आकलनाच्या कक्षा रुंदावत जातात, आणि शिक्षण तथा तंत्र सुगम होण्यास मदत होते. मातृभाषेत शिक्षण घेऊन जर कुशल कामगार वर्ग किंवा कुशल संघटन निर्माण झाले तर व्यवसायात वृद्धी होईल. उद्योगाभिमुख शिक्षण घेण्यात किंवा तंत्र अवगत करण्यात भाषा हा अडसर राहणार नाही त्यामुळे

शक्यतो आकलनास योग्य अशा मातृभाषेत शिक्षण घ्यावे आणि ते ज्ञान उद्योगांसाठी झोकून द्यावे असे सावरकर सुचवतात. त्या काळात उदयोन्मुख तरुणांना यंत्रसामग्री आणि इतर भांडवल उभारण्यासाठी पैशाची चणचण असेल तर आपल्या परीने आर्थिक मदत सुद्धा करत. नुसता सल्ला देऊन हे प्रोत्साहन करण्यापेक्षा त्यांच्या अशा आर्थिक मदतीमुळे तेंव्हा अनेक तरुण स्वावलंबी, स्वयंपूर्ण होऊ शकले, याकडे दुर्लक्ष करून कसे चालेल ! या सगळ्याच्या धर्तीवर आपण आपला देश जास्तीत जास्त पुढे नेण्यासाठी, स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनाचा स्तर वाढवण्यासाठी यंत्रशक्तीचा जास्तीत जास्त वापर करून देश बलवान करावा, अद्ययावत करावा, आपले जीवन सुखकर करावे, असा विचार देणारे आणि त्यासाठी कृति करणारे सावरकर हे जाणते, द्रष्टे, आणि कृतीशील नेते ठरतात.

■ ■ ■

# नोंदी



# महाराष्ट्रातील मर्दानी आणि मैदानी खेळ

श्रीशिवछत्रपतींनी तरुण पिढीचे बलसंवर्धन करून महाराष्ट्रातील युवाशक्ती जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला. युवाशक्तीला योग्य दिशा देऊन हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. हा आदर्श घेऊनच आजच्या तरुणाईनेही बुद्धी आणि बलाची योग्य आराधना केली पाहिजे. महाराष्ट्रातील महापुरुषांच्या कौशल्य विचारांचा अभ्यास करतानाच बलोपासनेकडेही लक्ष दिले पाहिजे. मर्दानी खेळ हे तरुणाईला शौर्याची आठवण करून देतील.

'व्यायामाद्वारे सुदृढता' हा मूलमंत्र वाढीस लागण्यासाठी व्यायामाची आवड व त्याचे महत्त्व जतन करणे आवश्यक आहे. चालणे, धावणे, योगासने, सूर्यनमस्कार, विविध मैदानी खेळ याद्वारे निरोगी राहण्यासाठी व सुदृढता वाढीस लागण्यास मदत होईल. जागतिकीकरणाच्या युगामध्ये शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित राहण्यासाठी, तसेच ताण -तणाव कमी करण्यासाठी खेळांद्वारे निरोगी राहण्याचे महत्त्व जपणे आवश्यक आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक दैनंदिन कामकाजात व्यस्त असतात. आरोग्यासाठी

वेळेचे नियोजन केल्यास व्यायामाची आवड जोपासून सुदृढता व कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.


देशाच्या व राज्याच्या विकास प्रक्रियेमध्ये कुशल आणि सक्षम मनुष्यबळ असणे अतिशय आवश्यक असते. त्यासाठी मैदानी खेळांकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. मैदानी खेळ म्हणजे असे खेळ जे मैदानावर खेळले जातात. या खेळांमध्ये संपूर्ण शरीराची हालचाल होते. मैदानी खेळ खेळण्याने शरीर स्वस्थ राहतं. शरीराचा व्यायाम होतो, आणि शरीर तंदुरुस्त राहते. मैदानी खेळ हे वेगवेगळ्या प्रकारचे असतात. काही खेळ हे एकट्याने खेळायचे असतात तर काही अनेक खेळाडू एकत्र येऊन खेळले जातात. या खेळांमध्ये क्रिकेट, फूटबॉल, उंचउडी, लंगडी, खो-खो, कबड्डी, बॅडमिंटन, बास्केटबॉल, थ्रोवबॉल, पकडापकडी, अशा विविध खेळांचा समावेश होतो. मैदानी खेळ हे प्रत्येक वयोगटाचे व्यक्ती आनंदाने खेळतात.

काही परंपरागत अर्थात मर्दानी खेळांमध्ये दंड बैठका, योगासने हे साधन विरहित व्यायाम प्रकार आहेत. जोडी कवायत, लाठी, घुंगरू काठी हे साधनयुक्त खेळ आहेत. जम्बिया, लाठी लढत हे द्वंद्वयुक्त व्यायामाचे प्रकार आहेत. भाला, बनेटी, तलवार, दांडपट्टा, फरीगदगा, बाना, माडू हे संरक्षणात्मक व्यायामाचे प्रकार तथा मैदानी खेळ आहेत. लेझीम आणि स्त्रियांचे विविध व्यायामाचे प्रकार हे तालबद्ध व्यायामात मोडतात. मल्लखांब हे सर्वांग सुंदर व्यायामाचे उदाहरण मानले जाते. त्याचबरोबर लोकनृत्यातूनही आनंददायी व्यायाम होत असतो. मर्दानी खेळांची माहिती संकलित करून रुची असेल त्या खेळात प्राविण्य मिळविले पाहिजे. या प्रकरणात मर्दानी खेळांची तोंडओळख दिली आहे. हे खेळ तज्ज्ञ क्रीडा शिक्षक किंवा प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखालीच खेळावेत.

## दांडपट्टा

दांडपट्टा किंवा पट्टा हे तलवारीसारखे पात्याचे शस्त्र आहे. सहसा यामध्ये लांबलचक, सरळसोट आकाराचे, पोलादापासून बनवलेले पाते मुठीवर चढवता येणाऱ्या चिलखती हातमोजास जोडलेले असते. चिलखती हातमोजा मूठ व कोपरापासून पुढचा हात झाकेल, असे असते. (मराठी मावळ्यांच्या पायदळाने अनेक युद्धमोहिमांत याचा परिणामकारक वापर केला. याची भेदकता तलवारीहून जहाल मानली जाते. उभ्या हिंदुस्थानात या शस्त्रावर मराठी मावळ्यांइतके नियंत्रण कोणाचेच नव्हते. मुघल, राजपूत लोकांमध्येही दांडपट्टा हे हत्यार असायचे, पण मराठी मावळ्यांइतके ते पटाईत नव्हते, असे इतिहासकार सांगतात.)

पट्टा फिरवणे मोठे कौशल्याचे काम आहे. खुप कसब आणि अभ्यास असलेला माणूस पटटा व्यवस्थित फिरवू शकतो. पूर्वीचे लोक १६ हात लांब पट्टाही वापरत. याला बेल्टप्रमाणे कंबरेभोवती गुंडाळले जाई. लिंबाचे दोन तुकडे पट्ट्याने होतात. पट्ट्याची लांबी ५ फुट असते, त्याचे पाते ४ फुट असून त्याची मूठ म्हणजे खोबळा साधारण एका फुटाचा असतो. याचे पाते लवचिक असते, पण लवचिक असले तरी याच्या कौशल्याने केलेल्या वाराने उभा माणूस चिरला जावू शकतो. पट्टा चालवणारा जणु काही आपल्या भोवती १० फुटांचा पोलादी घेर उभा करतो. याचं वैशिष्ट्य म्हणजे पाते जरी लवचिक असले तरी पण याची वार करण्याची तलवारीपेक्षा क्षमता जास्त असते, याचं कारण आपण तलवार फिरवताना सगळा



**दांडपट्ट्याचे प्रात्यक्षिक**

जोर आपल्या मनगटातून लावत असतो, पण प्रत्यक्षात पट्टा फिरवताना आपला पूर्ण हात आपला दंड, खांदे या सर्व अवयवांतून ताकद लागलेली असते. पाते लवचिक असले तरी, जर वार करताना पाते लपकले नाही, अन् वार सरळ झाला तर सरळ एक घाव दोन तुकडे होतात.

तलवारीप्रमाणेच पट्टाही कालबाह्य झाला आहे आणि ह्या शस्त्राचा उपयोग जवळजवळ लुप्त झाला आहे; परंतु हातघाईच्या प्रसंगी पट्ट्याचा उपयोग खूपच होतो. म्हणून याची थोडीफार माहिती असणे महत्त्वाचे आहे.

**पट्ट्याचे वार कसे मारले जातात–** पट्ट्याचे पाते जमिनीशी समांतर असता वार करून जाईल त्यावेळी पट्ट्याच्या धारी (दोन्ही बाजूस धार असते) आडव्या समांतर पातळीतून जातील ही स्थिती कंठ मार, गर्दन (गळा), पोट पाय यांना सरसहा आडवे कापण्याकरिता केलेल्या वारांच्या वेळी अनी मारताना दिसून येईल. उभ्या पातळीतून वार मारले जातात हे खरे; परंतु स्थानाप्रमाणे तिरकस वार मारले जातात. काट-छाट, चीर, हात कट, पाव कट.

**पट्टा धरतात कसाः–** पट्ट्याच्या खोळ्यात आपला हात पालथा घालून मुठीत आत असलेली आडवी लोखंडी जाड सळई धरावी. खोबळ्याच्या आरंभी असलेली कडी ही आपल्या पालथ्या प्रकोष्ठाखाली येते. त्यामुळे पट्ट्याचा खोबळा मागून उचकला जात नाही.

**पट्ट्याचे प्रकार -**

१. फलांग मारणे

२. डूक घेणे

३. चक्र घेणे

४. पट्टा पाठीवर घेणे


५. बैठक मारणे.

## तलवारबाजी

प्राचीन काळापासून अनेक प्रकारचे खेळ मनोरंजनासाठी, तसेच युद्धामध्ये वापरले जायचे, त्यामधील एक खेळ म्हणजे तलवारबाजी. तलवारबाजी या खेळाला इतिहास काळापासून महत्व राहिले आहे. परंतु हा खेळ उन्हाळी ऑलिंपिक स्पर्धांमध्ये १८९६ च्या पहिल्या आवृत्तीपासून खेळवला गेला आहे. ऑलिम्पिक खेळांमध्ये कायमस्वरूपी खेळल्या गेलेल्या पाच खेळांपैकी एक आहे. महिलांची तलवारबाजीही ओलम्पिकमध्ये खेळवण्यात येते. तलवारबाजीमध्ये एपी, थ्रस्टिंग आणि सेबर ह्या तीन प्रकारच्या तलवारी वापरल्या जातात.

तलवारबाजी खेळण्यासाठी एक मैदान असते ज्याला 'पिस्ट' असे म्हणतात. पिस्ट ४६ फूट लांब आणि सुमारे ६ फूट रुंद असते. या खेळामध्ये खेळाडूंना एकमेकांवर वार करायचा असतो आणि त्या खेळाडूंनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्याने केल्या प्रहारापासून आपला स्वतःचा बचाव करावा. या खेळामध्ये सर्वाधिक गुण मिळवणारा खेळाडू विजेता म्हणून घोषित केला जातो.

## फरीगदगा



फरी व गदगा या ढाल, तलवारी सारख्या साधनांनी खेळावयाचा द्वंद्वात्मक खेळ म्हणजे फरीगदगा होय. यातील फरी म्हणजे कातड्याची केलेली ढाल. ती सुमारे 23 सेंटीमीटर (नऊ इंच) व्यासाची असून, आत कापूस, लोकर किंवा काथ्या भरलेला असतो. गदगा 90 सेंटीमीटर (तीन फूट) लांबीची चामड्याने मढवलेली वेताची किंवा वेळूची काठी असते. या काठीला कातडी मूठ लावलेली असते. हा खेळ ६*६ मीटर जागेत खेळला जातो. घाई व छूट (सूट) हे या खेळाचे दोन प्रकार आहेत.

## लेझीम

हा महाराष्ट्रीयन व्यायामाचा प्रकार असून, तो विशेषतः ग्रामीण भागात प्रचलित आहे. मुले व मुली दोघेही या व्यायाम प्रकारात भाग घेऊ शकतात. हलगी, ढोल वाद्यामुळे लेझीम खेळणाऱ्यांना जोर चढतो. सर्वजण देहभान विसरून लेझीम खेळतात. या खेळात हलगी, ढोल-ताशा किंवा झांजांच्या ठेक्यावर लेझीम खेळले जाते. रांगांमध्ये उभे राहून ठेक्यावर तालबद्ध हालचाली करणे, गोलाकार उभे राहत एकमेकांच्या जागा घेत फेर धरणे, ठेका कायम ठेवत विविध आकार तयार करणे, बसून लेझीम खेळणे असे प्रकार या खेळात समूहाने सादर केले जातात. मोर चाल, चौ मूखी मोर चाल, डावीकडे आणि उजवीकडे मोर चाल अशा पद्धतीने काही ठिकाणी हा खेळ खेळला जातो.



## गदा/ मुदगल

बाहू भक्कम करण्याचा व्यायाम प्रकार म्हणजे गदा किंवा मुदगल होय. मुदगल गोलाकार लाकडापासून बनवतात. त्याला पकडण्यासाठी पाठीमागे मूठ असते. वेगवेगळ्या पद्धतीने मुदगल फिरवून व्यायाम केला जातो. मुदगल व्यक्तीपरत्वे वेगवेगळ्या वजनात बनवून घेतला जातो.

## दंड

अनेक व्यायाम शाळा म्हणजेच आखाड्यांमध्ये बलभीमाच्या साक्षीने दंड बैठका काढल्या जातात. शरीर कमावण्याच्या दृष्टीने दंडाला फार महत्त्वाचे स्थान आहे. दंडाचे सुमारे 25 प्रकार पडतात. त्यात सिधे दंड, गुठण दंड, जोर दंड आदींचा समावेश होतो.

## भालाफेक

भाला हे लांब दांडीचे शस्त्र आहे. सहसा बांबू किंवा लाकडापासून भाला बनवतात. त्याच्या एका टोकाला धातूचे पाते बसवलेले असते. वेगाने धावत जाऊन लक्ष्यावर अचूक भालाफेक करणे मोठे कुशलतेचे काम आहे. भालाफेकच्या सरावामुळे हात, पायाचे स्नायू शक्तिशाली होतात. वेगाने धावणे, मन एकाग्र होणे असे भालाफेक या खेळाचे फायदे आहेत.



लाठीचे प्रात्यक्षिक

## लाठी

लाठी किंवा काठी स्वसंरक्षण करू शकते, तसेच लाठीचा व्यायाम केल्याने हातांचा व्यायाम होऊन हात बळकट होतात. लाठी चालवताना वेगवेगळे पवित्र घ्यावे लागतात. त्यासाठी प्रशिक्षित शिक्षकाकडून लाठी हा खेळ शिकून त्याची सतत प्रात्यक्षिके करणे आवश्यक असते.

## मल्लखांब

मल्लखांब वैशिष्ट्यपूर्ण व खास व्यायाम असून, त्यामुळे शरीर लवचिक बनण्यास मदत होते. त्यातील मनोरे हा प्रकार आकर्षक, चपळाईचा व मनोरंजक आहे. मल्लखांब लाकडापासून बनवितात. जमिनीपासून वर 360 सेंटीमीटर व जमिनीच्या आत 90 सेंटीमीटर असतो. मल्लखांबाला एरंडीचे तेल लावतात. साधी अढी, खांदा अढी, दो हाती अढी, मागील गोफण, कर्मासन आणि मल्लखांबावरील मनोरे असे विविध व्यायाम प्रकार मल्लखांबावर करता येतात.

## कुस्ती

हा खेळ प्राचीन काळापासून एक मर्दानी खेळ मानला जातो. दांडग्या शरीरयष्टीसमवेत डाव, चपळता, निर्णय क्षमता या खेळात महत्त्वाचे असतात. कलाजंग, ढाक, मोळी, निकाल, आतील व बाहेरील टांग,


एकेरी आणि दुहेरी पट, गदालोट, धोबीपछाड असे काही डावपेच कुस्तीत असतात. महाराष्ट्रात मातीवर कुस्ती खेळली जात असे. कुस्तीचे ऑलिंपिक सामने जाड सतरंजीवर आता खेळले जातात. महाराष्ट्राचे खाशाबा जाधव यांनी कुस्ती खेळातील पहिले ऑलम्पिक पदक भारताला मिळवून दिले.

## लंगडी

विशिष्ट मैदानात काही खेळाडूंनी धावत फिरणे व एकाने आपल्या एका पायावर तोल सावरून दुसरा पाय मागे उचलून पळणाराचा पाठलाग करत त्याला स्पर्श करणे, तर पळणाराने हुलकावण्या देत आपण बाद होणार नाही याचा सतत प्रयत्न करणे, हे लंगडी या खेळाचे स्थूल वैशिष्ट्य आहे. नऊ वर्षाखालील मुलांसाठी ९.१५ मीटर चौरस, अकरा वर्षाखालील मुलांसाठी १०.६४ मीटर चौरस व तेरा वर्षाखालील मुलांसाठी १२.१९ मीटर चौरस क्रीडांगणा आखतात. त्यात एका बाजूस प्रवेशाची खूण असते. प्रत्येक संघात नऊ खेळाडू असतात. लंगडी हा खेळ अतिशय मजेने खेळला जातो.

## लगोऱ्या

या खेळास “लिंगोरचा” असेही म्हणतात. या खेळात वापरल्या जाणाऱ्या चपट्या लाकडी गोल ठोकळ्यांना लगोरी असे म्हणतात. रचलेल्या लगोऱ्या चेंडू फेकून विस्कळीत केल्या जातात. लगोरी फोडणाऱ्याने लगोरीची चळत फोडली की उडालेला वा पडलेला चेंडू लगोरी रचणाऱ्या खेळाडूंपैकी एकाने एकदाच लाथाडायचा असतो; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे काम लगोरी लावणे ठरते. ज्या संघाने लगोरी फोडली त्याच संघातील खेळाडूंनी लगोऱ्या एकावर एक रचने महत्त्वाचे असते. ज्या संघाच्या अधिक लगोऱ्या होतात त्याला अधिक गुण मिळवून तो विजयी होतो. या खेळामध्ये सांघिक व्यायामासोबत खेळाडूंचे आणि दर्शकांचे मनोरंजन होते. संत एकनाथ महाराजांच्या गाथेतही या खेळाचा निर्देश आढळतो.



## विटीदांडू

महाराष्ट्रातील खेडोपाडीच्या मुलांमध्ये विटीदांडू हा लोकप्रिय खेळ आहे. त्यात व्यायाम व मनोरंजन यांचा समन्वय आहे. या खेळात खूप काटेकोर नियम नसतात. या खेळाला एक लाकडी विटी आणि दांडू इतकेच साहित्य

लागते. विटी साधारणतः दोन ते पाच इंच लांब असते. एक ते सव्वा इंच व्यासाची आणि दोन्ही टोकांना निमुळती असते. दांडू मुठीत धरता येईल या आकाराचा म्हणजेच सुमारे सव्वा इंच व्यासाचा आणि दीड फूट लांबीचा असतो. खेळताना जमिनीत खोलगट भाग (बदी) तयार करून त्यावर विटी ठेवून ती कोलली जाते. कोललेली विटी समोरच्या खेळाडूंनी झेलली तर कोलणारा बाद होतो. लीळाचरीत्र, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम आदींच्या संत साहित्यातही या खेळाचा उल्लेख आढळतो.

## रस्सीखेच

हा खेळ म्हणजे दोन प्रतिस्पर्धी संघ आपापली ताकद आजमावण्याच्या उद्देशाने एक जाड दोर परस्पर विरुद्ध दिशांना खेचून धरीत प्रतिस्पर्ध्याला आपल्या हद्दीत ओढण्याचा प्रयत्न करतात. या खेळासाठी सुमारे दहा ते बारा सेंटीमीटर व्यासाचा चांगल्या दर्जाचा मऊ सूत दोर वापरतात. हा खेळ मैदानासह आंतरगृहातही खेळला जातो. रस्सीखेच या खेळाचा सन १९०० मध्ये ऑलम्पिक क्रीडा स्पर्धेत समावेश झालेला आहे.

## फुगडी



महाराष्ट्रातील मुली व स्त्रिया यांच्यात फुगडी हा खेळ लोकप्रिय आहे. वारीला जाताना वारकरी पुरुषही मृदंगाच्या तालावर आनंदाने फुगडी घालतात. त्यामुळे महाराष्ट्रीय लोकसंस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या पारंपरिक लोकनृत्यातही फुगडीची गणना होते. या प्रकारात दोन मुली किंवा स्त्रिया समोरासमोर उभ्या राहून हातांचा तिढा घालून एकमेकींचे तळहात पकडतात. नंतर मागे रेलून व पाय जुळवून गरगर फिरतात. एक हाती फुगडी, दंड फुगडी, बस फुगडी, लोळण फुगडी, कासव फुगडी असे फुगडीचे अनेक प्रकार आहेत. चार जण मिळूनही फुगडी खेळू शकतात.

## संदर्भ :-


१. भारतीय व्यायाम दर्शन : महाराष्ट्र शासन सचिवालय, क्रीडा व युवक सेवा विभाग
मुद्रक - कल्पना मुद्रणालय, टिळक रोड, पुणे -३०

२. मराठी विश्वकोष


■ ■ ■

**Lessons on technical education and morality, sanitation and agriculture, and some useful arts, should be interspersed among them in progressive series.**

**(Statement for Hunter commission)**

**"यांत्रिकी, नीतीबोध, आरोग्य, शेतकी आणि उपयुक्त कला या विषयांवरील पाठ या पुस्तकांमधून श्रेणीनुसार वाढत्या प्रमाणात देण्यात यावे".**

**(हंटर आयोगापुढील निवेदन)**

**- संदर्भ -महात्मा फुले समग्र वाङमय पृ. २४९**